# अनुसूचित जमाती कल्याण समिती

## २०१०-२०११

## (बारावी महाराष्ट्र विधानसभा)

**अकोला, बुलढाणा व पुणे जिल्हा परिषद कार्यालयातील अनुसूचित जमातीच्या अधिकारी/कर्मचारी यांची भरती, बढती, आरक्षण व अनुशेष तसेच जिल्हा परिषदेमार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजना यासंबंधीचा अहवाल**

# दुसरा अहवाल

**(हा अहवाल विधानसभा/विधानपरिषद सभागृहाला दिनांक २४ जुलै २०१० रोजी सादर करण्यात आला.)**

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, मुंबई
जुलै, २०१०

# अनुसूचित जमाती कल्याण समिती

## २०१०-२०११

## (बारावी महाराष्ट्र विधानसभा)

# दुसरा अहवाल

# महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
# अनुसूचित जमाती कल्याण समिती
# २०१०-२०११

## समिती प्रमुख

(१) श्री. सुरेश धस, वि.स.स.

## सदस्य

(२) श्री. आनंदराव गेडाम, वि.स.स.

(३) श्री. रामरतनबापू राऊत, वि.स.स.

(४) श्रीमती निर्मला गावित, वि.स.स.

(५) श्री. राजाराम ओझरे, वि.स.स.

(६) श्री. जगदीशचंद्र जगदीशभाऊ वळवी, वि.स.स.

(७) श्री. किसन कथोरे, वि.स.स.

(८) श्री. उमाजी बोरसे, वि.स.स.

(९) ॲड. चिंतामण वनगा, वि.स.स.

(१०) श्री. दौलत दरोडा, वि.स.स.

(११) श्री. धनराज महाले, वि.स.स.

(१२) श्री. एम.एम. शेख, वि.प.स.

(१३) श्री. राजेंद्र मुळक, वि.प.स.

(१४) श्री. रमेश शेंडगे, वि.प.स.

(१५) श्री. परशुराम उपरकर, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. अनंत कळसे, प्रधान सचिव.

(२) श्री. म.मु.काज, उप सचिव.

(३) श्री.ला.ना.जाधव,अवर सचिव (समिती).

(४) श्री. आनंद राहाटे, कक्ष अधिकारी.

## महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
## अनुसूचित जमाती कल्याण समिति
## २००८-२००९

(१) श्री. म.ना.बरोरा, वि.स.स. तथा मा. समितीप्रमुख.

(२) श्री. तुकाराम बिरकड, वि.स.स.

(३) श्री. शशिकांत शिंदे, वि.स.स.

(४) श्री. रमेश चौधरी, वि.स.स.

(५) श्री. सुरेश इंगळे, वि.स.स.

(६) * रिक्त

(७) श्री. राजाराम ओझरे, वि.स.स.

(८) श्री. बबनराव घोलप, वि.स.स.

(९) श्री. बाळा नांदगावकर, वि.स.स.

(१०) डॉ. संदिप धुर्वे, वि.स.स.

(११) श्री. राजकुमार पटेल, वि.स.स.

(१२) श्री. एम.एम.शेख, वि.प.स.

(१३) श्री. दिलीपराव सोनावणे, वि.प.स.

(१४) श्री. वसंत पवार, वि.प.स.

(१५) श्री. परशुराम उपरकर, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. अनंत कळसे, प्रधान सचिव.

(२) श्री. विजय दि. जोशी, उप सचिव.

(३) श्री. ज्ञा. न. माहुरे, समिती अधिकारी.

(४) श्री. दिलीप येवला, कक्ष अधिकारी.

(* श्री. नितिन राऊत, वि.स.स. यांची मंत्रीपदी नियुक्ती झाल्याने सदर जागा रिक्त)

# प्रस्तावना

मी, अनुसूचित जमाती कल्याण समितीचा प्रमुख, समितीने अधिकार दिल्यावरून समितीचा दुसरा अहवाल सभागृहास सादर करीत आहे.

समितीने अकोला, बुलढाणा व पुणे जिल्हा परिषद कार्यालयातील अनुसूचित जमातीच्या अधिकारी व कर्मचारी यांची भरती, बढती, आरक्षण, अनुशेष तसेच जिल्हा परिषदेमार्फत अनुसूचित जमातीसाठी राबविण्यात येणा-या विविध कल्याणकारी योजनांबाबत माहिती घेण्याचे ठरविले. त्यानुसार समितीने दिनांक २७ व २८ जानेवारी २००९ रोजी जिल्हा परिषद कार्यालय, अकोला व बुलढाणा तसेच दिनांक १ जुलै २००९ रोजी जिल्हा परिषद कार्यालय, पुणे येथे प्रत्यक्ष भेट देऊन संबंधित अधिका-यांशी चर्चा केली. समितीला प्रश्नावलीच्या संदर्भात प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या तसेच प्रत्यक्ष भेटीच्या वेळी मिळालेल्या माहितीच्या अनुषंगाने समितीने दिनांक ३ जून २०१० रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. प्रत्यक्ष भेटीच्या व साक्षीच्या वेळी मिळालेल्या माहितीवर सखोल विचार करून समितीने त्या संदर्भात नोंदविलेले आपले अभिप्राय व शिफारशी या अहवालात समाविष्ट केल्या आहेत.

विभागीय सचिवांनी तसेच इतर संबंधित अधिका-यांनी समितीस माहिती देऊन केलेल्या सहकार्याबद्दल समिती त्यांची आभारी आहे.

समितीने प्रारूप अहवाल दिनांक १९ जुलै २०१० रोजीच्या बैठकीत विचारात घेतला व तो संमत केला.

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक : १९ जुलै २०१०.

**सुरेश धस,**
समिती प्रमुख,
अनुसूचित जमाती कल्याण समिती.

# अहवाल

## जिल्हा परिषद, अकोला

अनुसूचित जमाती कल्याण समितीने दिनांक २७ जानेवारी २००९ रोजी जिल्हा परिषद, अकोला येथे भेट दिली. या जिल्हा परिषदेच्या कार्यालयातील अधिकारी व कर्मचारीवर्ग यांच्या सेवासंदर्भात अनुसूचित जमातीच्या उमेदवारांची भरती, बढती, आरक्षण, अनुशेष व जिल्हा परिषदेच्या अनुसूचित जमातीच्या जनतेसाठी राबविण्यात येणा-या विविध योजनांबाबत अकोला जिल्हा परिषदेकडून पाठविलेल्या माहितीच्या अनुषंगाने समितीने जिल्हा परिषद कार्यालयातील अनुसूचित जमातीच्या कर्मचा-यांच्या सेवाविषयक बाबी हाताळण्यासाठी जिल्हा परिषदेमध्ये "विशेष मागासवर्गीय कक्ष" स्थापन करण्यात आला आहे काय, असल्यास केव्हापासून तसेच त्यासाठी किती अधिकारी व कर्मचारी उपलब्ध करून देण्यात आलेले आहेत. तसेच अनुसूचित जमातीच्या कर्मचा-यांकडून त्यांच्यावर होत असलेल्या अन्यायाच्या संदर्भात जिल्हा परिषदेकडील मागासवर्ग कक्षाकडे निवेदने प्राप्त झाली आहेत काय, असल्यास त्याचे स्वरूप काय आहे. अशी समितीकडून विचारणा करण्यात आली असता जिल्हा परिषदेकडून पुढीलप्रमाणे लेखी स्वरूपात माहिती प्राप्त झाली.

जिल्हा परिषदेमधील मागासवर्गीय कर्मचा-यांच्या सेवाविषयक बाबी हाताळण्याकरिता मुख्य कार्यकारी अधिकारी जि. प. यांचे आदेश क्र.२३११/२००० दिनांक २१ ऑक्टोबर २००० तसेच आदेश क्र.२३१६/०६, दिनांक २४ ऑगस्ट २००६ अन्वये मागासवर्ग कक्ष स्थापन करण्यात आला असून समाज कल्याण अधिकारी यांचे अधिनस्त १ शाखाधिकारी, वरिष्ठ सहायक, कनिष्ठ सहायक (संगणक) व परिचरांच्या सेवा उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत. तसेच या कार्यालयातील कोणत्याही कर्मचारी/अधिकारी यांचेकडून जिल्हा परिषद कायार्लयाकडे तक्रारी प्राप्त झालेल्या नाहीत. उक्त माहितीनुसार समितीने या कार्यालयाकडून दिलेल्या माहितीमध्ये असे म्हटले आहे की, कोणत्याही कर्मचारी वा अधिका-याकडून तक्रार प्राप्त झालेली नाही. पण समितीकडे मात्र अशी तक्रार प्राप्त झालेली आहे, असे असताना जिल्हा परिषदेकडे तक्रार आलेली नाही असे आपण कसे म्हणू शकता अशी विचारणा केली त्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी या प्रश्नावलीमध्ये सन २००५-२००६ ते २००८ या काळात तक्रारी वा निवेदने प्राप्त झालेली आहेत काय असा प्रश्न विचारला आहे. त्याला अनुलक्षून हे उत्तर देण्यात आलेले आहे. मार्च, २००८ पर्यंत आमच्याकडे अशी कोणतीही तक्रार वा निवेदन आलेले नाही. मात्र श्रीमती गेडाम यांची तक्रार त्यानंतर आलेली आहे आणि त्याबाबत न्यायालयात देखील दावा दाखल आहे. त्यामुळे न्यायालयाच्या आदेशाचा निश्चितपणे मान राखला जाईल असे समितीला सांगितले.

समितीने श्रीमती रंजना गेडाम या आपल्या सेवेतील कर्मचा-यांनी तक्रार केलेली आहे. त्यानुसार त्यांचे म्हणणे आहे की, त्यांनी जात पडताळणी प्रमाणपत्र आपल्याकडे सादर केलेले आहे पण त्यांना पदौन्नती देण्यात आलेली नाही. मात्र श्री. सोनकुसरे यांनी प्रमाणपत्र दिलेले नसताना त्यांना पदौन्नती दिलेले आहे. श्री. सोनकुसरे यांना जात पडताळणी समितीकडून वैधता प्रमाणपत्र मिळाले आहे काय वैधता प्रमाणपत्र नसताना श्री. सोनकुसरे यांना पदौन्नती कशाच्या आधारे दिली त्याबद्दलचा नियम काय आहे अशी समितीने विचारणा केली असता त्यावर उपमुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सामान्य प्रशासन विभाग) यांनी श्री. सोनकुसरे हे १९९१ मध्ये वरिष्ठ सहायक म्हणून सरळ सेवा अनुसूचित जमातीमधून सेवेत आलेले आहेत आणि त्यानंतर त्यांना अकोला जिल्हा परिषदेत वरिष्ठ सहायक या पदावर घेण्यात आलेले आहे. त्यांनी जातीचे प्रमाणपत्र सादर केलेले नाही. परंतु सध्या त्यांचेबाबत न्यायालयीन प्रकरण चालू आहे. त्यांना अद्यापपर्यंत जात प्रमाणपत्र मिळालेले नसल्याने त्यांना सेवा ज्येष्ठतेनुसार खुल्या प्रवर्गातून पदौन्नती देण्यात आलेली आहे. तसेच श्री. सोनकुसरे यांनी राखीव कोट्यातून अद्यापपर्यंत कुठलाही लाभ घेतलेला नाही. त्यांनी खुल्या वर्गातूनच लाभ घेतलेला आहे. तसेच जिल्हा परिषदेने देखील त्यांना कुठल्याही राखीव पदावर पदौन्नती दिलेली नाही असे समितीला बैठकीच्यावेळी सांगण्यात आले, समितीने या प्रकरणी आपण समितीला चुकीची माहिती देत आहात. श्री. सोनकुसरे अनुसूचित जमातीमधून आलेले असताना त्यांना खुल्या प्रवर्गातून पदोन्नती देण्यात आली आहे. तसेच श्री. पवनीकर हे अनुकंपा तत्वावर १९९७ मध्ये अनुसूचित जमातीमध्ये दाखवून वरिष्ठ सहायक पदावर आले असून त्यांच्याकडून अनुसूचित जमातीचे वैधता प्रमाणपत्र न घेता त्यांना पदौन्नती देण्यात आलेले आहे अशी समितीला माहिती आहे, यामध्ये नेमकी स्थिती काय आहे, या बाबतीत सुप्रीम कोर्टाचा आणि शासनाचा निर्णय काय आहे तसेच त्यांना जात पडताळणी समितीकडून वैधता प्रमाणपत्र मिळाले आहे काय अशी समितीने विचारणा केली. त्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. यांनी असे सांगितले की, श्री. पवनीकर यांना दिनांक १६ फेब्रुवारी १९८७ मध्ये खुल्या प्रवर्गातून नियुक्ती देण्यात आली होती आणि त्यानंतर वरिष्ठ सहायक म्हणून त्यांना दिनांक ७ जानेवारी, १९९७ रोजी खुल्या प्रवर्गात बढती देण्यात आलेली आहे. श्री. पवनीकर हे हलबा कोष्टी जातीचे असून त्यांना जातीचे वैधता प्रमाणपत्र सादर करावे असे कळविण्यात आले आहे. शासनाच्या नियमानुसार त्यांनी जातीचे वैधता प्रमाणापत्र सादर केले नाही तर त्यांना त्यांच्या मूळ पदावर परत पाठविण्यात येईल आणि ते १९९५ नंतरचे असतील तर त्यांना सेवेतून काढून टाकण्यात येईल. तसेच समितीला पुन्हा एकदा सांगू इच्छितो की, ते खुल्या प्रवर्गामध्ये १९८७ मध्ये सेवेत नियुक्त झाले आहेत आणि १९९७ ला त्यांची पदौन्नती झालेली आहे. तरीही मी त्याबद्दल पूर्ण चौकशी करतो आणि योग्य ती कारवाई करतो असे समितीला आ वासित केले असताना समितीने चौकशी नको. आपण त्यांना वैधता प्रमाणपत्राशिवाय पदौन्नती दिलेली आहे. तेव्हा त्यांना प्रथमतः पदावनत (रिव्हर्ट) करण्याची कारवाई केली पाहिजे. तसेच त्यांना आपण पदावनत करून चालणार नाही तर पदोन्नती दिल्यानंतर जो त्यांना वाढीव पगाराचा लाभ झाला आहे त्याची वसुली देखील आपणास करावी लागेल व शासनाच्या नियमाप्रमाणे

कारवाई करावी असे समितीचे मत आहे. या प्रकरणात आमच्या कार्यालयाकडून त्यात काही चूक झाली असावी पण ते हलबा जातीचे असल्याचे त्यांनी प्रमाणपत्र दिलेले आहे. सुरुवातीस ते अनुसूचित जमातीचे असल्याचे त्यांनी प्रमाणपत्र दिले होते नंतर त्यांनी प्रमाणपत्र काढून घेतलेले आहे. याबाबत चौकशी करून योग्य ती कारवाई केली जाईल असे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी समितीला आ वासन दिले.

**अनुसूचित जमाती कल्याण समितीने अकोला जिल्हा परिषदेस दिलेल्या भेटीच्यावेळी मिळालेल्या माहितीच्या अनुषंगाने दिनांक ३ जून २०१० रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली.**

साक्षीच्या वेळी अनुसूचित जमातीच्या कर्मचा-यांकडून त्यांच्यावर होत असलेल्या अन्यायाच्या संदर्भात जिल्हा परिषदेकडील मागासवर्गीय कक्षाकडे प्राप्त झालेल्या निवेदनावर केलेल्या कार्यवाहीबाबत पुढील-प्रमाणे लेखी स्वरूपात समितीला माहिती देण्यात आली.

सदर विषयाचे अनुषंगाने प्राप्त निवेदनानुसार श्री. सोनकुसरे, कक्ष अधिकारी यांनी अनुसूचित जमाती या प्रवर्गाचे जात वैधता प्रमाणपत्र न देता त्यांना अनुसूचित जमातीच्या जागेवर पदोन्नत केल्याचे सदर तक्रारीमध्ये नमूद करण्यात आले आहे. समितीने विचारणा केल्यानुसार श्री.सोनकुसरे हे जिल्हा परिषद अकोला येथे आंजिब ने रुजू झाल्यानंतर त्यांना अनुसूचित जमातीचे या प्रवर्गाचे राखीव पदावर पदोन्नत करण्यात आले नसून त्यांना खुल्या प्रवर्गामधूनच सेवा ज्येष्ठतेनुसार पदोन्नत करण्यात आले आहे. याबाबत समितीस प्रत्यक्ष पदोन्नती समितीचे इतिवृत्त दाखविण्यांत आले आहे. तसेच तक्रारीमध्ये नमूद श्री. महागांवकर यांचीसुद्धा खुला या प्रवर्गामधून पदोन्नती झाली असल्याचे इतिवृत्त नोंदवहीनुसार समितीला दाखविण्यात आले आहे.

सदर निवेदनानुसार श्री.पवनीकर व श्री.घुले, कक्ष अधिकारी यांचे प्रकरण मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अकोला यांनी दिलेल्या आ वासनानुसार सदर प्रकरणी प्रत्यक्ष पडताळणी करून त्यानुसार श्री. पवनीकर व श्री. घुले यांना सन १९९७ मध्ये अनुसूचित जमातीचे राखीव पदावर कनिष्ठ सहायक या पदावरून वरिष्ठ सहायक या पदावर पदोन्नत केले होते व त्यानुसार त्यांना वारंवार जात वैधता प्रमाणपत्र सादर करणेबाबत कळविण्यात आले होते. परंतु त्यांनी जात वैधता प्रमाणपत्र सादर केले नसल्याने व याबाबत समितीने शिफारस केल्यानुसार श्री. पवनीकर व श्री. घुले, कक्ष अधिकारी यांना पदावनत करून त्यांना पूर्ववत कनिष्ठ सहायक या पदावर आणण्याकरिता दिनांक २७ जानेवारी २००९ नुसार अंतिम नोटीस देण्यात येऊन त्यांना सात दिवसांचे आत जात पडताळणी प्रमाणपत्र सादर करणेबाबत सूचित करण्यात आले होते. त्यानुसार त्यांनी प्रमाणपत्र सादर न केल्यामुळे त्यांना या कार्यालयाचे आदेश क्र.जि.प./साप्रवि/स्था-२/कावि/१२४१/०९, दिनांक २४ एप्रिल २००९ अन्वये पदावनत करण्यात आले आहे. सदर आदेशा विरुद्ध संबंधीतांनी अपील दाखल केले असून उक्त प्रकरणी अंतीम निर्णय प्रलंबित आहे. या प्रकरणी जिल्हा परिषद प्रशासनाने कार्यवाही पूर्ण केलेली आहे.

उक्त लेखी स्वरूपात दिलेल्या माहितीच्या अनुषंगाने साक्षीच्यावेळी समितीने विचारणा केली की, श्री. पवनीकर व श्री. घुले या कर्मचा-यांना कक्ष अधिकारी या पदावर सन १९९७ मध्ये पदोन्नती दिल्यानंतर त्यांच्याकडे जात वैधता प्रमाणपत्राची मागणी करण्यात आली. परंतु, अद्यापही त्यांनी ते सादर केलेले नसल्यामुळे त्यांना बडतर्फ का केले नाही अशी विचारणा केली असता विभागीय सचिव, ग्राम विकास विभाग यांनी श्री. पवनीकर व श्री. घुले यांना पदोन्नती दिली त्यावेळेस जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्याची सक्ती नव्हती परंतु, मागील पाच वर्षांपासून ही सक्ती करण्यात आल्याने त्यांच्याकडे जात वैधता प्रमाणपत्राची मागणी करण्यात आली पण त्यांनी ते सादर न केल्याने त्यांना पदावनत करण्यात आले आहे असे सांगितले, समितीने श्री.पवनीकर व श्री. घुले यांना कनिष्ठ सहायक पदावर पदावनत केल्यानंतर सात दिवसात त्यांनी जात पडताळणी प्रमाणपत्र सादर करण्यासंबंधीची नोटीस देण्यात आली. परंतु, त्यांनी तसे प्रमाणपत्र न आणल्यामुळेच त्यांना पदावनत केले आहे. पण त्या आदेशाविरुद्ध त्यांनी अपील दाखल केलेले आहे. मुळात अशा कमर्चा-यांना बडतर्फ का केले नाही हा प्रश्न निर्माण होतो. त्याबाबत आपण काय कारवाई केली आहे तसेच ज्यावेळेपासून आपण जात वैधता प्रमाणपत्राची मागणी करीत आहात तेव्हापासून त्यांनी या पदाचा जेवढा अतिरिक्त पगार घेतलेला आहे त्याची वसुली करण्याच्या बाबतीत काय परिस्थिती आहे अशी पुन्हा बिचारणा केली असता विभागीय सचिव यांनी श्री. पवनीकर व श्री. घुले खुल्या प्रवर्गातून आलेले आहे व त्यांना पदोन्नती मात्र अनुसूचित जमातीच्या वर्गासाठी राखीव असलेल्या जागेवर देण्यात आली त्यामुळे त्यांच्याकडे आता जात वैधता प्रमाणपत्राची मागणी करण्यात आली आहे. अशा परिस्थितीत त्यांना बडतर्फ करू शकत नाही. परंतु, खालच्या पदावर आणता येते. त्यांच्यावर जी कारवाई करण्यात आली त्यालाच अतिरिक्त आयुक्तांनी स्थगिती दिलेली आहे असे समितीला सांगितले.

समितीने जो निर्णय घेतला त्यावर संबंधित कर्मचा-याने अपील केले व समितीच्या निर्णयाला डावलून अतिरिक्त आयुक्त स्थगिती देऊ शकतो काय असल्यास तो समितीचा अवमान आहे व विशेषाधिकाराचा भंग देखील होऊ शकतो. तसेच श्री. महागावकर व श्रीमती गेडाम यांचे काय प्रकरण आहे असे समितीने विचारणा केली त्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी श्री. महागावकरच्या विरोधात मानीव तारीखसंबंधी श्रीमती रंजना गेडाम यांची तक्रार होती व त्या अनुषंगाने महागावकर यांची मानीव तारीख रद्द केली. परंतु, त्यामुळे श्रीमती गेडाम यांचा फायदा होत नसून त्यांच्यावर अन्याय होत आहे असे श्रीमती गेडाम यांना वाटल्यामुळे त्यांनी उपोषणाचा मार्ग पत्करला व त्यासंबंधात माननीय आयुक्तांनी त्यांना भेटण्यासाठी बोलाविले असता त्या गेल्या नाहीत म्हणून अतिरिक्त आयुक्तांनी त्यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करण्यासंबंधी जिल्हा परिषदेला कळविले व त्यामुळे त्यांना निलंबित करण्यात आले आहे असे समितीला सांगितले. समितीने घेतलेल्या निर्णयाच्या विरुद्ध जाऊन अतिरिक्त आयुक्तांनी ही स्थगिती दिलेली आहे. अशावेळी समितीच्या निर्णयाविरुद्ध अतिरिक्त आयुक्तांनी निर्णय घेतलेला असल्यामुळे त्यांच्या विरोधात शासनाला अहवाल सादर करण्यात येईल. या प्रकरणी अतिरिक्त आयुक्तांनी जिल्हा

परिषदेचे मत विचारात घेतले आहे किंवा नाही समितीने दिलेल्या निर्णयाप्रमाणे त्यांनी कार्यवाही केलेली नाही अशी समितीने विचारणा केली असता विभागीय सचिव, ग्रामविकास विभाग यांनी त्या दोघांना दिनांक २४ एप्रिल २००९ रोजी पदावनत केल्यामुळे त्यांनी अतिरिक्त आयुक्तांकडे अपील केले होते. अपर आयुक्तांनी स्थगिती देऊन एक वर्षाचा कालावधी झालेला आहे असे समितीस सांगितले. समितीने जिल्हा परिषदेला भेट दिली होती त्यावेळी याबाबतचा निर्णय घेतला होता. त्याच्या विसंगत अतिरिक्त आयुक्तांनी निर्णय घेतला आहे. मुख्य कार्यकारी अधिका-यांनी अतिरिक्त आयुक्तांना पत्र दिले नसेल तर एका अर्थाने हा समितीचा अवमान आहे. वर्ग-३ व वर्ग-४ च्या कर्मचा-यांना निलंबित करण्याचे अधिकार समितीला आहेत. श्री.घुले व श्री.पवनीकर कक्ष अधिकारी यांनी जात वैधता प्रमाणपत्र १८ वर्षांचा कालावधी उलटून गेलेला असताना सुद्धा सादर केलेले नाही. त्यामुळे त्यांच्याकडून वसुली केली पाहिजे, त्यांना बडतर्फ केले पाहिजे. असे समितीचे मत आहे, यावर विभागीय सचिव, ग्रामविकास विभाग यांनी जिल्हा परिषदेने त्यांना पदावनत केलेले आहे. परंतु, त्यांना बडतर्फ करता येणार नाही. जिल्हा परिषद कायद्याच्या कलम १३ नुसार त्यांनी अतिरिक्त आयुक्तांकडे अपील केलेले आहे. परंतु, अतिरिक्त आयुक्तांना क्वासिज्युडिशिअल अधिकार असल्यामुळे त्यांनी स्थगिती दिलेली आहे. स्थगिती देऊन एक वर्ष होऊन गेल्यावरही त्यांनी सुनावणी घेतली नसल्यामुळे याप्रकरणी लवकरात लबकर सुनावणी घेऊन अंतिम निर्णय घेण्यात यावा अशी सूचना त्यांना देण्यात येईल. अशी समितीला माहिती दिली.

समितीने या प्रकरणी एक वर्ष उलटल्यानंतरही अतिरिक्त आयुक्तांनी सुनावणी घेतलेली नाही. म्हणजे ही प्रशासकीय दिरंगाई झालेली आहे. समितीने जो निर्णय घेतला होता, त्यालाच त्यांनी स्थगिती दिलेली आहे असा याचा अर्थ होतो हे योग्य नाही. **श्रीमती रंजना हरिभाऊ गेडाम या आदिवासी महिलेवर १८ वर्षांपासून पदोन्नतीबाबत अन्याय झालेला आहे. श्री. घुले व श्री. पवनीकर हे श्रीमती गेडाम यांच्यापेक्षा सेवाज्येष्ठतेत कनिष्ठ आहेत. या महिलेला डावलून या दोघांना वर्ग-२ वर बढती देण्यात आली आहे. श्रीमती रंजना गेडाम यांच्यावर अन्याय झाल्यामुळे त्यांनी उपोषणाचा मार्ग अनुसरला परंतु, आयुक्तांनी त्यांनाच निलंबित केलेले आहे. डिसेंबर, २००७ पर्यंत या दोघांकडून जात वैधता प्रमाणपत्र घ्यावे असे कळविलेले असताना त्यांनी सादर केलेले नाही. त्यामुळे त्यांना त्या पदावर राहण्याचा अधिकार नाही.** असे समितीचे मत आहे. यावर विभागीय सचिव यांचे असे मत पडले की, श्री.पवनीकर ज्या पदावर काम करीत होते ते पद आरक्षित प्रवर्गातील नव्हते. ते खुल्या प्रवर्गातून आले होते. त्यांनतर त्यांना पदोन्नती देण्यात आली होती. तसेच त्यावेळी श्री. महागावकर, श्री. बेळे व श्री. घुले यांना बढती देण्यात आली होती. त्यामुळे जागा रिक्त नसल्यामुळे श्रीमती गेडाम यांना पदोन्नती देता आलेली नाही. जागा रिक्त झाली असती तर त्यांना पदोन्नती देता आली असती. परंतु, अतिरिक्त आयुक्तांनी जिल्हा परिषदेच्या निर्णयाला स्थगिती दिली असल्यामुळे हा प्रश्न निर्माण झाला आहे. याप्रकरणी तातडीने सुनावणी घेण्यात यावी असे त्यांना कळविण्यात येईल. समितीने श्रीमती गेडाम यांच्यावर अन्याय झाल्यामुळे त्यांनी दाद मागितली होती.

परंतु, त्यांनाच निलंबित करण्यात आले आहे. तसेच अतिरिक्त आयुक्तांनी त्यांच्या अधिकाराचा गैरवापर केलेला आहे. **त्यांनी आजपर्यंत जात वैधता प्रमाणपत्र सादर केलेले नसल्यामुळे जिल्हा परिषदेच्या निर्णयाला दिलेली स्थगिती चुकीची आहे.** याप्रकरणी संबंधित कर्मचा-यांनी व आयुक्तांनी संगनमताने नियोजनबद्धरित्या हे सर्व केलेले आहे असे समितीचे मत झाले आहे. तसेच अतिरिक्त आयुक्त हे सुप्रीम कोर्ट, शासन व समिती यांच्यापेक्षा मोठे आहेत काय या प्रकरणी समितीचे असे मत झाले आहे की, श्री. घुले व श्री. पवनीकर यांच्यावर जिल्हा परिषदेने केलेली कार्यवाही योग्य आहे. या दोघांना चुकीच्या पद्धतीचा अवलंब करुन पदोन्नती देण्यात आली आहे. त्यामुळे या दोघांना निलंबित करावे आणि रिक्त झालेल्या पदावर श्रीमती गेडाम यांना पदोन्नती देण्यात यावी असा समितीचा निर्णय आहे. तसेच श्री.घुले व श्री.पवनीकर यांना आरक्षित जागेवर पदोन्नती दिली असल्यामुळे व त्यांनी वैधता प्रमाणपत्र अद्याप सादर केलेले नसल्यामुळे त्यांना पदोन्नती मिळाल्यापासून ते पदावनत करण्यापर्यंतच्या कालावधीतील वेतनाची वसुली करण्यात यावी असे समितीने मत व्यक्त केले असता विभागीय सचिव यांनी समितीच्या निदेशाप्रमाणे कारवाई बरोबर आहे की, अतिरिक्त आयुक्तांनी दिलेली स्थगिती बरोबरआहे हा प्रश्न उभा राहणार आहे असे समितीला सांगितले असता, समितीने दिलेल्या निदेशांचे पालन होत नसेल तर, अतिरिक्त आयुक्तांविरुद्ध समिती हक्कभंगाचा प्रस्ताव दाखल करू शकते. त्यामुळे या दोघांनी वैधता प्रमाणपत्र सादर केले नसल्यामुळे त्यांना बडतर्फ करण्यात यावे व श्रीमती गेडाम यांना पदोन्नती देऊन त्यांना न्याय देण्यात यावा असा समितीचा निर्णय आहे.

सन १९९५ पूर्वी लागलेल्या आदिवासी बांधवांना शासनाने संरक्षण दिलेले आहे परंतु, त्यांना पदोन्नतीच्या वेळी संरक्षण दिलेले नाही. कारण पदोन्नतीच्या वेळी त्यांना जात वैधता प्रमाणपत्र सादर करावेच लागते. श्री.पवनीकर व श्री.घुले हे सेवेमध्ये खुल्या प्रवर्गातून लागले असले तरी, त्यांना अनुसूचित जमाती प्रवर्गातून चुकीच्या पद्धतीने पदोन्नती दिली आहे. या दोघांच्या प्रकरणी अतिरिक्त आयुक्तांनी दिलेल्या स्थगनादेशासंबंधी समिती कसल्याही प्रकारचे मत व्यक्त करीत नाही. समितीच्या निर्णयानुसार श्री. पवनीकर आणि श्री. घुले या दोघानाही सेवेतून निलंबित करावे. तसेच श्रीमती रंजना गेडाम यांना पदोन्नतीमध्ये ज्या तारखेपासून डावलण्यात आले आहे त्या तारखेपासून त्यांना पदोन्नती द्यावी असे समितीने मत व्यक्त केले असता विभागीय सचिव यांनी समितीच्या निदेशाप्रमाणे केलेली कारवाई बरोबर आहे की, अतिरिक्त आयुक्तांनी कायद्यानुसार दिलेली स्थगिती बरोबर आहे याबाबत समितीचे निदेश तपासून विभागाच्यावतीने योग्य ती कार्यवाही करण्यात येईल असे समितीला सांगितले या विषयाच्या अनुषंगाने समितीच्या अहवालात आवश्यक त्या शिफारशी करण्यात येतील. विभागाला जो काही निर्णय घ्यावयाचा असेल तो विभागाने घ्यावा. समितीने जो निर्णय घेतलेला आहे तो विभागाने आयुक्तांना कळवावा. तसेच श्री. पवनीकर व श्री. घुले यांना पदावनत करून, त्यांच्याकडून पदोन्नती दिलेल्या तारखेपासून वसुली करण्याबाबतची नोंद शेरेबुकात करावी. श्री. पवनीकर व श्री. घुले यांना पदावनत केल्यानंतर, त्यांच्या रिक्त होणा-या जागेवर लवकरात लवकर श्रीमती रंजना गेडाम यांना पदोन्नती देण्यात यावी असे समितीने निदेश दिले.

**अभिप्राय व शिफारस :**

समितीच्या अकोला जिल्हा परिषद येथे झालेल्या बैठकीच्या वेळी प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने माहिती घेत असता समितीला जिल्हा परिषद सेवेतील श्रीमती रंजना गेडाम यांच्याकडून प्राप्त झालेली तक्रार समितीच्या बैठकीत विचारात घेण्यात आली. श्रीमती गेडाम यांनी जिल्हा परिषद कार्यालयाकडे जात पडताळणी प्रमाणपत्र सादर केलेले असताना सुद्धा त्यांना पदोन्नती देण्यात आलेली नाही. परंतु, **श्री. सोनकुसरे यांनी जात पडताळणी प्रमाणपत्र सादर केलेले नसताना त्यांना पदोन्नती देण्यात आलेली आहे. याबाबत समितीने विचारणा केली असता श्री. सोनकुसरे सन १९९१ मध्ये वरिष्ठ सहायक म्हणून सरळसेवाद्वारे अनुसूचित जमाती प्रवर्गातून आलेले असून त्यांनी जातीचे प्रमाणपत्र अद्यापपर्यंत सादर केलेले नाही. परंतु, त्यांना खुल्या प्रवर्गातून पदोन्नती द्रेण्यात आली आहे. तसेच श्री. पवनीकर सन १९९७ मध्ये वरिष्ठ सहायक म्हणून अनुकंपाद्वारे अनुसूचित जमाती प्रवर्गातून आलेले असताना त्यांनी सुद्धा अद्यापपर्यंत जातीचे प्रमाणपत्र सादर केलेले नाही. परंतु, त्यांना खुल्या प्रवर्गातून पदोन्नती देण्यात आली आहे.** मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्याकडून त्यांना जातीचे वैधता प्रमाणपत्र सादर करण्याबाबत कळविण्यात आलेले होते. तथापि, त्यांनी अद्यापपर्यंत जात वैधता प्रमाणपत्र सादर केलेले नाही. **समितीने त्यांना वैधता प्रमाणात्राशिवाय पदोन्नती दिलेली असल्याने त्यांना पदावनत करावे व पदोन्नती मध्ये झालेल्या वाढीव पगाराची वसुली करण्यात यावी व शासनाच्या नियमाप्रमाणे चौकशी करून त्यांच्याविरुद्ध कारवाई करण्यात यावी असे समितीने बैठकीच्या वेळी मत व्यक्त केलेले असताना मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी या प्रकरणी चौकशी करून योग्य ती कारवाई करण्यात येईल असे समितीला आ वासित केले.** परंतु, विभागीय सचिवांच्या साक्षीच्या बैठकीपर्यंत कोणतीही ठोस कार्यवाही केल्याचे समितीच्या निदर्शनास आले नाही.

समितीच्या दिनांक ३ जून २०१० रोजी झालेल्या विभागीय सचिवांच्या साक्षीच्या बैठकीच्या वेळी श्री. पवनीकर व श्री. घुले यांना वारंवार जात वैधता प्रमाणपत्र सादर करणेबाबत कळविण्यात आले असतांना सुद्धा त्यांनी जात वैधता प्रमाणपत्र सादर केले नसल्याने त्यांना कक्ष अधिकारी या पदावरून पदावनत करून कनिष्ठ सहायक या पदावर आणण्यात यावे असे दिनांक २७ जानेवारी २००९ रोजीच्या पत्रानुसार अंतिम नोटीस देऊन त्यांना सात दिवसांच्या आत जात पडताळणी प्रमाणपत्र सादर करणेबाबत सूचित करण्यात आले होते. परंतु, त्यांनी प्रमाणपत्र सादर न केल्यामुळे जिल्हा परिषद कार्यालयाने **दिनांक २४ एप्रिल २००९ रोजीच्या पत्रान्वये त्यांना पदावनत केलेले आहे. सदर आदेशाविरुद्ध त्यांनी न्यायालयात अपील दाखल केलेले असून उक्त प्रकरणी अंतिम निर्णय प्रलंबित आहे तसेच साक्षीच्या बैठकीच्या वेळी समितीच्या असे ही निदर्शनास आले आहे की, श्री. पवनीकर व श्री. घुले खुल्या प्रवर्गातून आलेले आहे व त्यांना पदोन्नती मात्र अनुसूचित जमातीकरिता राखीव असलेल्या पदावर देण्यात आली** त्यामुळे त्यांच्याकडे जात वैधता प्रमाणपत्राची मागणी करण्यात आली आहे. तसेच जिल्हा परिषदेमार्फत

त्यांच्यावर जी कारवाई करण्यात आली आहे. त्यालाच अतिरिक्त आयुक्त यांनी स्थगिती दिली आहे. या स्थगितीच्या कालावधीस जवळपास एक वर्ष पूर्ण झालेले असताना अतिरिक्त आयुक्तांकडून कोणताही निर्णय घेण्यात आलेला नाही. समितीने घेतलेल्या निर्णयाच्या विरुद्ध जाऊन व जिल्हा परिषदेचे मत विचारात न घेता अतिरिक्त आयुक्त यांनी स्थगिती दिलेली असल्याने हा समितीचा अवमान आहे असे समितीचे मत आहे. श्री. पवनीकर व श्री. घुले यांनी जात वैधता प्रमाणपत्र १८ वर्षांचा कालावधी गेलेला असताना सुद्धा सादर केलेले नाही त्यामुळे त्यांना बडतर्फ केले पाहिजे होते. परंतु, जिल्हा परिषद कायद्याच्या कलम १३ नुसार त्यांनी अतिरिक्त आयुक्तांकडे अपील केले असून त्याला अतिरिक्त आयुक्तांनी स्थगिती दिलेली आहे. दिलेल्या स्थगितीस एक वर्षाचा कालावधी झालेला असल्याने या प्रकरणी लवकरात लवकर सुनावणी करून अंतिम निर्णय घेण्यात यावा अशी त्यांना सूचना करण्यात येईल असे ही सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीला आ वासित केले आहे.

**श्रीमती रंजना हरिभाऊ गेडाम आदिवासी महिलेवर १८ वर्षांपासून पदोन्नतीबाबत अन्याय झालेला असून श्री. पवनीकर व श्री. घुले हे दोघेही श्रीमती गेडाम यांच्यापेक्षा सेवा ज्येष्ठतेत कनिष्ठ असताना श्रीमती गेडाम यांना डावलून या दोघांना वर्ग-२ ची पदोन्नती देण्यात आली. श्रीमती गेडाम यांच्यावर अन्याय झाल्यामुळे त्यांनी दाद मागितली होती परंतु, त्यांनाच निलंबित करण्यात आले. ज्या कमर्चा-यांनी जात वैधता प्रमाणपत्र सादर केले नाही त्यांच्याविरुद्ध जिल्हा परिषदेच्या निर्णयाला दिलेली स्थगिती चुकीची आहे व अतिरिक्त आयुक्तांनी त्यांच्या अधिकाराचा गैरवापर केलेला आहे असे समितीने मत व्यक्त केले. त्यामुळे श्री. पवनीकर व श्री. घुले या दोघांना निलंबित करावे आणि रिक्त झालेल्या पदावर श्रीमती गेडाम यांना ज्या तारखेपासून डावलण्यात आले आहे त्या तारखेपासून पदोन्नती देण्यात यावी. तसेच या प्रकरणी ग्रामविकास विभागाला जो काही निर्णय घेणे आवश्यक आहे तो विभागाने घ्यावा तथापि, समितीने घेतलेला निणर्य विभागीय आयुक्तांना कळवून श्री. पवनीकर व श्री. घुले यांना पदावनत करून त्यांच्याकडून पदोन्नती दिलेल्या तारखेपासून त्यांच्या वेतनातून वसुली करण्याची कार्यवाही करावी तसेच रिक्त होणा-या जागेवर श्रीमती रंजना गेडाम यांना त्वरित पदोन्नती देण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला दोन महिन्याच्या आत पाठविण्यात यावा अशी समितीची शिफारस आहे.**

समितीच्या असे निदर्शनास आले आहे की, खाजगी माध्यमिक शाळांचे संस्थाचालक अनुसूचित जमाती एस. टी. साठी राखीव असलेली पदे उमेदवार मिळत नाहीत या कारणास्तव रिक्त ठेवतात व नंतर ती पदे दुस-या वर्गाच्या उमेदवारामधून भरतात. या सदंर्भात समितीच्यावतीने असे निदेश देण्यात येत आहेत की, अशा खाजगी माध्यमिक शाळांमधील अनुसूचित जमातीसाठी राखीव असलेली पदे भरत असताना त्याच

उमेदवारांची भरती केली पाहिजे. त्यात प्रामुख्याने अशा शाळांना दरवर्षी शिक्षणाधिकारी याची जी मान्यता घ्यावी लागते ती मान्यता देत असताना शिक्षणाधिका-यांनी सादर केलेल्या प्रस्तावावर सही करण्यापूर्वी त्या त्या संस्थांमधील **अनुसूचित जमातीसाठी राखीव पदे भरलेली आहेत की नाहीत किंवा हा अनुशेष पूर्ण केलेला आहे की नाही याची पडताळणी केल्याशिवाय मुख्य कार्यकारी अधिका-यांनी सही करू नये. तसेच ज्या प्रस्तावांना मान्यता दिली असेल अशा संस्थेची पुन्हा चौकशी करण्यात यावी व संस्थांचे अनुदान देखील थांबवावे असे केले तरच या संस्थांमधील अनुसूचित जमातीच्या उमेदवरांचा अनुशेष भरून निघेल.** असे समितीने मत व्यक्त केले असता सचिव, ग्रामविकास विभाग यांनी विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये असाही त्यामागे उद्देश असतो. म्हणून अशी पदे भरत असताना त्या पदांसाठी तीन वेळा जाहिरात दिली जाते व नंतरच ही पदे भरण्यात येतात असे सांगितले. समितीला सचिवांनी सांगितल्याप्रमाणे तीन वेळा जाहिरात दिली जाते परंतु, बीड जिल्ह्यातील जागा भरावयाची असेल तर नांदेड जिल्ह्यातील सर्वात कमी खपाच्या वर्तमानपत्रातून जाहिरात दिली जाते आणि नांदेडमधील पदे भरावयाची असतील तर बीड जिल्ह्यातील लोकल पेपरमध्ये जाहिरात दिली जाते. जेणेकरून ज्या उमेदवारांसाठी जागा राखीव आहेत त्यांच्यापर्यंत ते पोहचू शकणार नाही. म्हणून अशी पदे भरत असताना अशी अट घालणे आवश्यक आहे की, त्या त्या जिल्ह्यातीलच सर्वात जास्त खप असलेल्या नावाजलेल्या वर्तमानपत्रातूनच जाहिरात दिली पाहिजे आणि त्याच जिल्ह्यातील जे वैधता प्रमाणपत्रधारक एस.टी. उमेदवार असतील त्यांना प्राधान्य दिले पाहिजे. ही जबाबदारी शिक्षण विभागाने मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे देण्यात यावी व मुख्यकार्यकारी अधिकारी यांच्यामार्फत योग्य ती कारवाई करण्यात यावी असे समितीचे मत आहे.

शिक्षकांची पदे भरताना त्या त्या विषयाचे शिक्षक जर मिळत नसतील तर आदिवासीमधीलच सुशिक्षीत लोकांना अप्रशिक्षीत शिक्षण घेण्याचा अधिकार आपल्याला दिलेला आहे. यापूर्वी व्हीजेएनटी या प्रवर्गात असाच प्रकार शासनाने सुरू केलेला आहे. परंतु, एखाद्या विषयात प्राविण्य असलेल्या विषयाचाच शिक्षक पाहिजे म्हणून इतर कॅटेगरीजचे शिक्षक भरायचे व ज्यांच्यासाठी जागा रिक्त आहेत त्यांच्यावर अन्याय करायचा याला आळा घालणे आवश्यक आहे. तसेच मुख्य कार्यकारी अधिका-यांनी सुद्धा अशा संस्थांच्या प्रस्तावावर सही करण्यापूर्वी त्या संस्थेतील अनुसूचित जमातीचा अनुशेष भरलेला आहे की नाही याची शहानिशा केल्याशिवाय सही करू नये असे केले तरच अनुशेष भरण्याची काळजी त्या संस्था घेतील अशी समितीची सूचना आहे. त्यावर **सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीने सुचविलेली सूचना मुख्य कार्यकारी अधिका-यांना देण्यात येतील. तसेच याबाबत शिक्षण विभागाच्या सचिवांची देखील मान्यता घेण्यात येईल असे समितीला आ वासित केले. समितीला दिलेल्या आ वासनानुसार ग्रामविकास विभागाकडून लवकरात लवकर कारवाई करण्यात यावी व केलेल्या कारवाईचा अहवाल समितीला दोन महिन्याच्या आत पाठविण्यात यावा अशी समिती शिफारस करीत आहे.**

## जिल्हा परिषद, बुलढाणा

अनुसूचित जमाती कल्याण समितीची दिनांक २८ जानेवारी, २००९ रोजी जिल्हा परिषद कार्यालय बुलढाणा येथे बैठक घेण्यात आली. समितीने पाठविलेल्या प्रश्नावलीच्या अनुषंगाने जिल्हा परिषद कार्यालयीन सेवेत असलेल्या अधिकारी व कर्मचारी यांच्या सेवा संदर्भात अनुसूचित जमातीच्या उमेदवारांची सरळसेवाद्वारे भरती, पदोन्नती, आरक्षण व अनुशेष तसेच जिल्हा परिषदेमार्फत अनुसूचित जमातीच्या लोकांसाठी राबविण्यात येणा-या कल्याणकारी योजनांची माहिती घेत असताना समितीला बैठकीच्यावेळी प्राप्त झालेल्या माहिती पुस्तिकेनुसार जिल्हा परिषदेतील विविध विभागांमध्ये तांत्रिक/अतांत्रिक स्वरूपाची वर्ग १ ते ४ मधील एकूण किती पदे मंजूर आहेत. त्यापैकी किती पदे प्रत्यक्षात भरण्यात आलेली आहेत व एकूण किती पदे रिक्त आहे, मंजूर पदापैकी किती पदे राखीव आहेत. राखीव पदांपैकी प्रत्यक्षात किती पदे भरण्यात आलेली आहेत. याबाबत सरळ सेवाद्वारे भरण्यात आलेली पदे पुढील प्रमाणे लेखी स्वरूपात समितीला माहिती सादर करण्यात आली.

| अ. क्र. | संवर्ग | | मंजूर पद संख्या | | भरण्यात आलेली पदे | | रिक्त पदे | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | तांत्रिक | अतांत्रिक | तांत्रिक | अतांत्रिक | तांत्रिक | अतांत्रिक |
| १. | वर्ग १ अधिकारी | . . | ३ | १४ | ३ | १३ | ० | १ |
| २. | वर्ग २ अधिकारी | . . | १०४ | ९८ | १०४ | ९८ | - | - |
| ३. | वर्ग ३ कर्मचारी | . . | ३२२५ | ७०५५ | ३०५५ | ७०१६ | १७० | ३९ |
| ४. | वर्ग ४ कर्मचारी | . . | - | ७८२ | - | ७६९ | - | १३ |
| | एकूण | . . | ३३३२ | ७९४९ | ३१६२ | ७८९६ | १७० | ५३ |

जिल्हा परिषद कार्यालयाची वर्ग-१ व वर्ग-२ ची पदे शासन स्तरावर भरली जातात. वर्ग-३ च्या मंजूर असलेल्या एकूण पदांपैकी रिक्त असलेल्या अनुशेषाची पदे भरण्याची कार्यवाही सुरू आहे. त्यापैकी अनुसूचित जमातीकरिता मंजूर असलेल्या एकूण पदापैकी राखीव असलेल्या संवर्गनिहाय सरळसेवा पदांची माहिती खालीलप्रमाणे देण्यात आली.

| अ. क्र. | पदांचे नाव | | मंजूर पदे | अ.ज. करिता राखीव पदे | त्यापैकी भरलेली पदे | रिक्त पदे |
|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | | (३) | (४) | (५) | (६) |
| १. | ग्रामसेवक | | ५८९ | ४२ | ४१ | १ |
| २. | ग्राम विकास अधिकारी | . . | १८ | १ | ० | १ |
| ३. | विस्ताव अधिकारी (पंचायत) | . . | ११ | १ | ० | १ |

| अ. क्र. | पदांचे नाव | मंजूर पदे | अ.ज. करिता राखीव पदे | त्यापैकी भरलेली पदे | रिक्त पदे |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| ४. | पशुधनपर्यवेक्षक . . | ७८ | ६ | ५ | १ |
| ५. | औषधी निर्माता . . | ५७ | ४ | ३ | १ |
| ६. | अधिव्याख्याता . . | ४७ | ३ | १ | २ |
| ७. | उच्चश्रेणी सहायक अध्यापक | १४९ | १५ | १४ | १ |
| ८. | प्राथमिक शिक्षक | ७०५५ | ४९४ | ४४५ | ४९ |
| ९. | परिचर वर्ग-४ | ७८२ | ५५ | ५३ | २ |
| १०. | निम्नश्रेणी सहायक अध्यापक | २२५ | १६ | १५ | १ |
| ११. | कनिष्ठ सहायक | २६४ | १९ | १६ | ३ |
| | एकूण . . | ९२७५ | ६५६ | ५९३ | ६३ |

समितीला दिलेल्या उपरोक्त माहितीच्या अनुषंगाने समितीने जिल्हा परिषदेतील विविध विभागांमध्ये तांत्रिक/अतांत्रिक स्वरुपाची वर्ग-१ ते ४ मधील एकूण किती पदे मंजूर आहेत. त्यापैकी किती पदे प्रत्यक्षात भरण्यात आलेली आहेत व एकूण किती पदे रिक्त आहेत, रिक्त असण्याची कारणे काय आहेत व सदर रिक्त पदे भरण्यासाठी आतापर्यंत कोणते प्रयत्न करण्यात आलेले आहेत अशी समितीने विचारणा केली त्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी या कार्यालयात तांत्रिक पदे १७० व अतांत्रिक ५३ पदे रिक्त आहेत. वर्ग ३ व ४ ची अनुशेषाची पदे भरण्याची कार्यवाही सुरू आहे. अनुशेष असलेल्या रिक्त पदामध्ये कनिष्ठ सहायक (लिपीक) -३, प्राथमिक-४९, अधिव्याख्याता, परिचर वर्ग-४ ची २, अन्य पाच संवर्गात प्रत्येकी -१ याप्रमाणे एकूण ६३ पदे रिक्त आहे. असे समितीला सांगितले.

समितीने कनिष्ठ सहायकाची-४ व प्राथमिक शिक्षकाची ४९ पदे रिक्त असल्याची कारणे काय अशी विचारणा केली असता उप मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सा.प्र.वि.) यांनी कनिष्ठ सहायकाची ३ पदे सरळ सेवा भरतीची आहेत. ग्रामविकास विभागाच्या नियमित भरती कार्यक्रमानुसार व नवीन आकृतीबंधानुसार ही पदे भरण्यात येतील. वरिष्ठ सहायकाची डिसेंबर, २००८ मध्ये भरती झाली होती. अनुशेषाची पदे भरताना सहायक आयुक्त, मागासवर्गीय कक्ष, अमरावती यांच्याकडून बिंदू नामावली नोंदवह्या तपासून घेतल्या आहेत असे समितीला सांगितले. तसेच शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी दिनांक १५ जून १९९५ नंतर अनुसूचित जमातीचे जे कर्मचारी नियुक्त झालेले आहेत. परंतु, त्यांनी जात प्रमाणपत्र प्राप्त केले नाही अशा कर्मचा-यांना कमी केले आहे. त्यामुळे हा अनुशेष दिसत असून

त्याठिकाणी अप्रशिक्षित १२ उत्तीर्ण असलेले शिक्षण सेवक उमेदवार घेतले आहेत, तसेच केंद्रीय पद्धतीने प्राथमिक शिक्षकांची पदे भरताना हा अनुशेष भरण्यात येईल. अशी समितीला माहिती दिली. समितीने पदोन्नतीद्वारे भरण्यात येणारी वरिष्ठ सहायकाची सहा पदे कधी भरली जातील अशी विचारणा केली असता उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी पदोन्नतीची पदे याद्या प्रकाशित करून कनिष्ठ सहायकातून वरिष्ठ सहायकाची पदे भरण्यात येतील असे समितीला सांगितले.

कार्यकारी अभियंता, बांधकाम, जि.प. बुलढाणा, यांनी पदोन्नतीने भरावयाची कनिष्ठ अभियंत्यांची एकंदर ४ पदे होती त्यापैकी एक पद भरलेले आहे आणि ३ रिक्त आहेत. त्यानंतर स्थापत्य सहायकाची दोन पदे अनु.जमातीसाठी आरक्षित असून ती रिक्त आहेत. परंतु या पदांचे ३१ मार्च पर्यंत समायोजनेची कार्यवाही पूर्ण होईल आणि त्यानंतर ही पदे भरण्यात येतील. बिंदू नामावलीच्या तपासणीचे काम सुरू आहे. ते पूर्ण झाल्यानंतर या सर्वच पदांबाबतचा अनुशेष नेमका किती आहे ते समजू शकेल आणि त्यानंतर ती सर्व पदे भरण्यात येतील, असे समितीला सांगितले.

समितीने सरळ सेवा भरतीची ६३ पदे आणि पदोन्नतीने भरावयाची २३ पदे आहेत तेव्हा त्या भरतीबाबत लवकरात लवकर कारवाई करून त्याचा अहवाल समितीला सादर करण्यात यावा. तसेच जातीचे वैध प्रमाणपत्र सादर न करणा-याला देखील आपल्या कार्यालयाने पदोन्नती दिली आहे अशाप्रकारे ज्यांच्याकडून जात पडताळणी प्रमाणपत्र मिळालेले नाही अशांना पदोन्नती दिले आहे असे उदाहरण आपल्याकडे घडले आहे का, समितीला प्राप्त झालेल्या निवेदनाबाबत वस्तुस्थिती काय आहे, अशी विचारणा केली असता मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.बुलढाणा यांनी अशी काही प्रकारणे आहेत. मात्र त्यांना विहित मुदतीत जात पडताळणी प्रमाणपत्र सादर करण्याच्या अटीवरच त्यांना पदोन्नती दिलेली आहे. असे समितीला सांगितले

समितीने पदोन्नती दिलेल्या कर्मचा-यांना जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी आपण किती कालावधी दिलेला आहे याबाबत शासनाचा निर्णय काय आहे जोपर्यंत वैधता प्रमाणपत्र सादर केले जात नाही तोपर्यंत उमेदवारास पदोन्नती देता येत नाही. असे असताना आपण त्यांना पदोन्नती का दिली जे आपल्या कार्यालयीन सेवेत आहेत पण त्यांनी जात पडताळणीचे प्रमाणपत्र सादर केलेले नाही अशा कर्मचा-यांना पदोन्नती दिली आहे काय, असेल तर अशा कर्मचा-यांना शासनाच्या नियमानुसार पदोन्नती देता येऊ शकते काय, अशी पुन्हा विचारणा केली त्यावर कार्यकारी अधिकारी, बांधकाम, जि.प. यांनी अशा प्रकारे पदोन्नती दिली असल्यास त्यांनी सहा महिन्यांच्या मुदतीत जात पडताळणीचे वैधता प्रमाणापत्र दिले पाहिजे होते. ते दिले नसल्याने त्यांना त्याबाबत नोटीस दिलेली आहे असे समितीला सांगितले.

**समितीने अशा कर्मचा-यांना नुसती नोटीस द्यायची नाही तर त्यांना पदोन्नती दिली असेल तर त्या पदावरुन ताबडतोब पदावनत केले पाहिजे. सहा महिन्यात त्यांनी वैधता प्रमाणपत्र सादर केले आहे की**

नाही याची माहिती घेऊन, समितीच्या होणा-या आढावा बैठकीमध्ये प्रत्येक खातेनिहाय अशी पदोन्नती ज्यांनी दिली आहेत त्यांना पदावनत करण्याचे काढण्यात आलेले आदेश समितीला आणून दाखवावेत. याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी प्रत्येक खात्याचा आढावा घेऊन माहिती घ्यावी आणि ज्यांनी जातीचे वैधता प्रमाणपत्र सहा महिन्यांच्या आत सादर केलेले नाही त्यांना पदोन्नती दिली गेली आहे त्यांना पदावनत केल्याचे आदेश काढावेत आणि त्याचा अहवाल समितीला द्यावा.

अनुसूचित जमाती कल्याण समितीने दोन दिवस अकोला व बुलढाणा जिल्ह्यात भेट देऊन पाहणी केली आहे. येथे मोठ्या प्रमाणावर बोगस आदिवासींचे प्रमाण आढळले आहे. येथील आदिवासी प्रकल्प कार्यालय, अकोला अंतर्गत २००६-२००७ मध्ये काही घरकुले दिली गेली असताना यामध्ये काही लोकांनी जात बदलवून अनुसूचित जमाती मधील गोंड जात रेकॉर्डवर लिहिली आहे, अशाप्रकारे बोगसपणे जात बदलवून घरकुले मिळण्याकरिता या लोकांनी जात बदलली आहे. विशेषतः अकोला विभागातील हा प्रश्न आहे. रामे वर शिवण्पा नागीले यांच्यासह आठ लाभार्थींनी त्यांची मूळ जात बदलली आहे. त्यांना तत्कालीन तहसिलदार यांनी गोंड समाजाचे जातीचे प्रमाणपत्र दिले आहे. श्री. नागीले यांच्या आजोबाच्या कागदपत्राच्या नकला बघितल्या नंतर त्या कागदपत्रावरुन श्री. नागीले यांच्या आजोबांची जात कोळी होती हे आढळून आले आहे. परंतु तहसिलदार यांनी कोळी ही जात बदलून गोंड या आदिवासी अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र दिलेले आहे ही बाब धक्कादायक आहे. तसेच साहेबराव बन्सीलाल शेळकर यांना देखील तहसिलदारांनी गोंड जातीचे प्रमाणपत्र दिलेले आहे. वास्तविक जन्ममृत्यूच्या रजिस्टरमध्ये त्यांची जात कोळी दाखविली आहे. समितीकडे अशाप्रकारे जात दिल्याचे पुरावे असून कोणत्याही अधिका-याला निलंबित करण्याचे अधिकार समितीला आहेत. त्यामुळे आज समिती असा ठराव घेत आहे की, याबाबत चौकशी करण्यासाठी १० दिवसांचा अवधी देण्यात येत आहे. तहसिलदारासह दोषी असलेल्या संबंधितांना १० दिवसांच्या आत निलंबित करावे. हे अतिशय गंभीर प्रकरण आहे, त्यामुळे त्यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करण्यात यावा. असे समितीने मत व्यक्त केले असता, त्यावर अपर जिल्हाधिकारी, अकोला यांनी सदरील जात प्रमाणपत्र कोणत्या कालावधीत वितरित करण्यात आलेले आहेत याची माहिती घेऊन चौकशी करून संबंधित अधिका-यांवर कारवाई करण्यात येईल. समितीने याबाबत माननीय समिती सदस्यांनी भावना व्यक्त केलेल्या आहेत. कारण हा अतिशय गंभीर प्रश्न आहे. यासाठी चौकशी करण्यासाठी त्यांना वेळ दिलेला आहे, त्या कालावधीत चौकशी करून समितीला अहवाल सादर करावा. असे समितीने निदेश दिले.

जिल्हा परिषद कार्यालय, बुलढाणा येथे झालेल्या बैठकीत प्राप्त झालेल्या माहितीच्या अनुषंगाने समितीने दिनांक ३ जून २०१० रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीला जिल्हा परिषद, बुलढाणा या कार्यालयाकडून पुढीलप्रमाणे माहिती प्राप्त झाली :—

## सरळसेवा भरती पदांची माहिती

| अ. क्र. (१) | संवर्ग (२) | रिक्त पदे (३) | शेरा (४) |
|---|---|---|---|
| १ | कनिष्ठ सहायक (लि) | ४ | अनुकंपा तत्त्वावर नियुक्तीचे आदेश देणे बाबत कार्यवाही सुरू आहे. |
| २ | विस्तार अधिकारी (पं) | १ | रिक्त पदे ही माहे जून २००९ चे शासनाचे वेळापत्रकानुसार भरण्यात आले आहे. |
| ३ | ग्रामसेवक | १ | सदर पद आंतरजिल्हा दिलीने भरले आहे. |
| ४ | पशुधन पर्यवेक्षक | १ | निवड प्रक्रिया पुर्ण |
| ५ | उ.श्रे.सहा.अध्यापक (माध्यमिक) | १ | जाहिरात देऊन पद भरण्याची कार्यवाही सुरू आहे. |
| ६ | अधिव्याख्या | २ | प्रकरण न्यायप्रविष्ट असल्यामुळे पद रिक्त आहे |
| ७ | प्राथमिक शिक्षक | ४९ | २ मे २०१० रोजी CET परिक्षा घेण्यात आलेली आहे. निकाल दि. १ जून २०१० रोजी लागला असून मा. आयुक्त, परिक्षा परिषद यांचे वेळापत्रक प्राप्त झाल्या-नंतर मुलाखती घेऊन रिक्त पदे भरण्याची कार्यवाही करण्यात येईल. |
| ८ | परिचर वर्ग ४ | २ | अनुकंपा तत्त्वावर नियुक्ती देणे बाबत कार्यवाही सुरू आहे |
| | एकूण | ६३ | |

## पदोन्नतीने भरण्यात आलेल्या पदांची माहिती

| अ. क्र. (१) | संवर्ग (२) | रिक्त पदे (३) | शेरा (४) |
|---|---|---|---|
| १ | अधिक्षक | १ | माहे नोव्हेंबर २००९ मध्ये पद भरण्यात आले आहे. |
| २ | वरिष्ठ सहा. (लिपिक) | ६ | माहे नोव्हेंबर २००९ मध्ये पदे भरण्यात आले आहे. |
| ३ | ग्रा. विकास अधिकारी | १ | माहे मे २०१० मध्ये पद भरण्यात आले आहे. |
| ४ | कृषि अधिकारी | १ | पात्र कर्मचारी उपलब्ध नसल्याने पद रिक्त आहे. |
| ५ | वि.अ.(कृषी) | १ | पद भरण्याची कार्यवाही सुरू आहे |
| ६ | कनिष्ठ अभियंता | ३ | पदोन्नतीने पदे भरण्याची कार्यवाही सुरू आहे. |

| अ. क्र. (१) | संवर्ग (२) | रिक्त पदे (३) | शेरा (४) |
|---|---|---|---|
| ७ | स्थाप.अभि.सहा. | २ | समायोजनाने रिक्त पदे भरण्यात आली. |
| ८ | वर्णोपचारक | २ | बिंदू नामावली माहे एप्रिल, २०१० मध्ये तपासणी करण्यात आली असून पदोन्नतीने पदे भरण्यात येत आहेत. |
| ९ | पर्यवेक्षिका | ३ | ३ रिक्त पदापैकी २ पदे भरण्यात आलेली आहेत. |
| १० | वाहन चालक | १ | सदर पद भरण्याबाबत शासनाचे वेळापत्रकामध्ये वाहन चालक संवर्ग नाही. |
| ११ | कनिष्ठ सहा. (लि) | २ | माहे नोव्हेंबर २००९ मध्ये भरण्यात आली आहेत. |

समितीला वरीलप्रमाणे प्राप्त झालेल्या माहितीच्या अनुषंगाने समितीने सरळसेवा भरतीची ६३ व पदोन्नतीची २३ पदे भरण्याबाबत जिल्हा परिषद कार्यालयाने काय कार्यवाही केली आहे, अशी विचारणा केली असता सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीच्या बुलढाणा येथील भेटीच्या वेळी उक्त पदे भरण्याबाबत जि.प. ने समितीला आ वासन दिले होते. त्यानुसार कनिष्ठ सहायक (लि) ची ४ पदे रिक्त असून, उक्त पदे अनुकंपा तत्त्वावर भरून, त्यांच्या नियुक्तीचे आदेश देण्याबाबतची कार्यवाही सुरू आहे. अनुकंपा तत्त्वावर पदे भरावयाची असली तरी त्यांच्याकडून जात वैधता प्रमाणपत्र घेतल्याशिवाय त्यांना नियुक्ती आदेश दिले जात नाहीत. कारण त्यांना अगोदरच नियुक्ती आदेश दिले आणि त्यांनी विहित मुदतीत जात वैधता प्रमाणपत्र सादर केले नाही तर पुन्हा अडचण निर्माण होऊ शकते. म्हणून नियुक्ती आदेश देण्यापूर्वी चारही उमेदवारांना जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यास सांगितलेले आहे. अद्याप त्यांनी जात प्रमाणपत्र सादर केलेले नाही. असे समितीला सांगितले.

समितीने या चारही उमेदवारांना जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्याबाबत स्मरणपत्र पाठवावे आणि जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी दोन महिन्यांची मुदत द्यावी. असे समितीने निदेश दिले.

पशुधन पर्यवेक्षकाची निवड करुन ठेवली आहे. त्यांना जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यास सांगितले आहे. जोपर्यंत त्यांच्याकडून जात वैधता प्रमाणपत्र सादर केले जाणार नाही तोपर्यंत त्यांना नियुक्ती पत्र दिले जाणार नाही. त्या कालावधीत त्यांनी जात वैधता प्रमाणपत्र सादर केले नाही तर, आमच्या स्तरावर त्याबाबतीत अंतिम निर्णय घेऊ. असेही अति. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी समितीला सांगितले समितीने निवड केलेल्या उमेदवारास सुद्धा जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यसाठी दोन महिन्यांची मुदत द्यावी.

जिल्हा परिषदेने पदे भरण्याबाबत वेळीच जाहिरात न दिल्यास जे पात्र उमेदवार आहेत ते अर्ज भरू शकले नाहीत तसेच जे उमेदवार वयाच्या कमाल मर्यादेपर्यंत आलेले असतील त्यांना नोकरीपासून वंचित राहावे लागले आहे. याचाच अर्थ त्यांचे एकप्रकारे नुकसान झालेले आहे, त्यामुळे लवकरात लवकर जाहिरात प्रसिद्ध करून, हे पद भरण्याबाबतची कार्यवाही पूर्ण करावी. अशी समितीने विचारणा केली असता अति. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी उक्त पदाच्या बाबतीत १५ दिवसांत वर्तमानपत्रामध्ये जाहिरात प्रसिद्ध करून, सदरहू पदे भरण्याची कार्यवाही पूर्ण करण्यात येईल. असे समितीला सांगितले.

समितीने प्राथमिक शिक्षकांनी पदे भरण्याबाबतची कार्यवाही किती दिवसांत पूर्ण होईल अशी विचारणा केली त्यावर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी प्राथमिक शिक्षकांची पदे भरण्यासाठी राज्य स्तरावर दिनांक २ मे २०१० रोजी CET परीक्षा घेण्यात आली असून, त्या परीक्षेचा निकालसुद्धा लागला आहे. माननीय आयुक्त, परीक्षा परिषद यांचे वेळापत्रक प्राप्त झाल्यानंतर पात्र उमेदवारांच्या मुलाखती घेऊन, प्राथमिक शिक्षकांची पदे भरण्याबाबतची कार्यवाही पूर्ण करण्यात येईल, असे सांगितले. तसेच अनुकंपा तत्त्वावरील संदर्भात संबंधित उमेदवारांना जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्याबाबत सांगितले आहे. अद्याप त्यांनी सदरहू प्रमाणपत्र सादर केले नाही. या संदर्भात सुद्धा संबंधितांना जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी स्मरणपत्र पाठविण्यात येईल, असे समितीला सांगितले.

**अभिप्राय व शिफारस :**

समितीला जिल्हा परिषद, बुलढाणा या कार्यालयात झालेल्या बैठकीच्यावेळी जिल्हा परिषद कार्यालयातील विविध विभागामध्ये तांत्रिक / अतांत्रिक पदांतील सरळसेवा द्वारे भरावयाची वर्ग-३ व वर्ग-४ ची अनुक्रमे १७० व ५२ पदे रिक्त आहेत तसेच सरळसेवा द्वारे अनुसूचित जमातीच्या उमेदवारांसाठी रिक्त असलेली एकूण ६३ पदे व पदोन्नतीने भरावयाची २३ पदे रिक्त असल्याचे समितीच्या निदर्शनास आले. **समितीने रिक्त असलेल्या पदांची तातडीने जाहिरात देऊन ही पदे भरण्याची त्वरित कारवाई करण्यात यावी व केलेल्या कारवाईचा अहवाल समितीला दोन महिन्यांत पाठविण्यात यावा, अशी समितीची शिफारस आहे.**

तसेच जातीचे वैधता प्रमाणपत्र सादर न केलेल्या कर्मचा-यांना सुद्धा जि.प. कार्यालयाने पदोन्नती दिलेली आहे व अशा कर्मचा-यांना सहा महिन्यांत जात वैधता प्रमाणपत्र सादर करणेबाबतही कळविण्यात आले आहे. तथापि अशा कर्मचा-यांनी गेल्या सहा महिन्यांत जात वैधता प्रमाणपत्र अद्यापपर्यंत सादर केलेले

नाही. अशा खातेनिहाय सन १९९५ नंतर ज्या कर्मचा-यांची सेवेत नियुक्ती झाली आहे व ज्यांना पदोन्नती दिलेली आहे अशा अनुसूचित जमातीच्या कर्मचा-यांबाबत चौकशी करून त्यांना पदावनत करण्यात आल्याचे आदेश तात्काळ काढण्यात यावे व केलेल्या कारवाई अहवाल समितीला तात्काळ पाठविण्यात यावा, अशी समितीची शिफारस आहे.

आदिवासी प्रकल्प अधिकारी अकोला यांच्या कार्यालयात सन २००६-२००७ मध्ये घरकुलाचे वाटप केलेल्या रेकॉर्डवर जात बदलवून काही लाभार्थ्यांना या योजनेंतर्गत घरकुलाचे वाटप करण्यात आले आहे. या प्रकरणी तत्कालीन तहसिलदार यांनी लाभार्थ्यांची कोळी ही जात बदलवून त्यांना गोंड आदिवासी अनुसूचित जमाती प्रमाणपत्र दिले आहे. वास्तविक जन्ममृत्यूच्या रजिस्टरमध्ये त्यांची जात कोळी दाखविली आहे. समितीने याप्रकरणी चौकशी करून तत्कालीन तहसिलदारासह दोषी असलेल्या संबंधित अधिकारी / कर्मचा-यांविरुद्ध कारवाई करण्यात यावी व केलेल्या कारवाईचा अहवाल समितीला तात्काळ पाठविण्यात यावा, अशी समितीची शिफारस आहे.

जिल्हा परिषद कार्यालयात अनुकंपा तत्त्वावर कनिष्ठ सहायकाची ४ पदे अनुसूचित जमाती या वर्गातून भरण्यात आलेली आहेत. या चारही उमेदवारांना नियुक्ती आदेश देण्यापूर्वी जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यास सांगितलेले असताना सुद्धा या चार उमेदवारांनी अद्यापपर्यंत जात प्रमाणपत्र जि.प. कार्यालयात सादर केलेले नसल्याने चारही उमेदवारांना स्मरणपत्र पाठवून जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी दोन महिन्यांची मुदत देण्यात यावी व त्यानंतर जात वैधता प्रमाणपत्र सादर न केल्यास शासन निर्णयाप्रमाणे कारवाई करण्यात यावी, अशी समिती शिफारस करीत आहे.

## जिल्हा परिषद, पुणे

समितीने दिनांक १ जुलै ते ३ जुलै २००९ या कालावधीत पूणे जिल्ह्याचा दौरा आयोजित केला असता दिनांक १ जुलै २००९ रोजी जिल्हा परिषद कार्यालय येथे समितीची बैठक घेण्यात आली. समितीला बैठकीच्यावेळी प्राप्त झालेल्या माहितीनुसार पुणे जिल्हा परिषदेच्या अधिकारी व कर्मचारी यांच्या सेवासंदर्भात अनुसूचित जमातीच्या उमेदवारांची भरती, बढती, आरक्षण, अनुशेष याबाबतची माहिती पुढीलप्रमाणे लेखी स्वरूपात देण्यात आली :—

## सरळसेवा विषयी माहिती

| अ.क्र. | संवर्गाचे नांव | तांत्रिक/ अतांत्रिक | एकूण मंजूर पदे | प्रत्यक्षात भरण्यात आलेली पदे | रिक्त पदे | अनुसूचित जमातीच्या उमेदवारांसाठी राखीव एकूण पदे | प्रत्यक्षांत असलेल्या अनु. जमातीच्या कर्मचाऱ्यांची संख्या | अनुशेष | अ.ज. अनुशेष राहण्याची कारणे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) |
| १. | वरिष्ठ सहायक (लि). | अतांत्रिक | ७९ | ७९ | . . | ५ | ५ | . . | |
| २. | कनिष्ठ सहायक | अतांत्रिक | ४२१ | ४२१ | . . | ५ | ५ | . . | |
| ३. | वाहनचालक | तांत्रिक | ४५ | ४५ | . . | ३ | ३ | . . | |
| | एकूण . . | | | | | | | . . | |
| | **अर्थ विभाग** | | | | | | | | |
| १. | कनिष्ठ लेखाधिकारी | अतांत्रिक | १ | १ | . . | . . | . . | . . | |
| २. | वरिष्ठ सहायक लेखा | अतांत्रिक | १० | १० | . . | १ | १ | . . | |
| | एकूण . . | | ११ | ११ | . . | १ | १ | . . | |
| | **ग्रामपंचायत विभाग** | | | | | | | | |
| १. | ग्रामसेवक | अतांत्रिक | ८०६ | ७७८ | २८ | ५७ | ५५ | २ | १ पद ग्राप कर्म. राखीव असून पात्र उमेदवार उपलब्ध नाही. १ पद आंतर जिल्हा बदली प्रस्ताव मान्य केला असून रुजू होणेबाबत आदेश दिलेले आहेत. |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २. | ग्रामविकास अधिकारी | तांत्रिक | ४३ | २९ | १४ | ३ | १ | २ | स्पर्धा परिक्षा निकाल अप्राप्त असल्याने |
| ३. | विस्तार अधिकारी (पं) | तांत्रिक | १४ | १३ | १ | १ | १ | . . | |
| ४. | विस्तार अधिकारी (सां) | अतांत्रिक | १५ | १५ | . . | १ | १ | . . | |
| | एकूण . . | | ८७८ | ८३५ | ४३ | ६२ | ५८ | ४ | |

बालकल्याण विभाग

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | स.बा.वि.प्र.अधिकारी | तांत्रिक | ४ | ४ | . . | . . | . . | . . | |
| २. | पर्यवेक्षिका | तांत्रिक | १४२ | १४२ | . . | ११ | ८ | ३ | अं |
| ३. | वरिष्ठ सहायक (सांख्यिकी) | तांत्रिक | १८ | १८ | . . | १ | १ | . . | |
| | एकूण . . | | १६४ | १६४ | . . | | ९ | ३ | |

पशुसंवर्धन विभाग

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पशुधन पर्यवेक्षक | तांत्रिक | १५७ | १३० | २७ | ११ | ७ | ४ | पद भरतीस स्थगिती आहे. |
| | एकूण . . | तांत्रिक | १५७ | १३० | २७ | | ७ | ४ | |

कृषि विभाग

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | कृषि अधिकारी | तांत्रिक | ५ | ५ | . . | १ | १ | . . | |
| २. | विस्तार अधिकारी (कृषि) | तांत्रिक | १८ | ५ | ३ | १ | १ | . . | |
| | एकूण . . | | २३ | २० | ३ | २ | | | |

| अ.क्र. | संवर्गाचे नांव | तांत्रिक/ अतांत्रिक | एकूण मंजूर पदे | प्रत्यक्षात भरण्यात आलेली पदे | रिक्त पदे | अनुसूचित जमातीच्या उमेदवारांसाठी राखीव एकूण पदे | प्रत्यक्षांत असलेल्या अनु. जमातीच्या कर्मचा-यांची संख्या | अनुशेष | अ.ज. अनुशेष राहण्याची कारणे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) |
| | | | | बांधकाम (उत्तर) विभाग | | | | | |
| १. | कनिष्ठ अभियंता | तांत्रिक | ७५ | ७५ | ० | ५ | ५ | ० | |
| २. | स्थापत्य अभि.सहायक | तांत्रिक | ९२ | ७७ | १५ | ० | ० | ० | सदरची पदे ही मिस्त्री १,२ अनुरेखक या संवर्गातून समावेशनाने भरणेबाबत शासन आदेश आहेत त्यामुळे बिंदुनामवली लागू नाही. |
| | एकूण . . | | ९२ | ७७ | १५ | ० | ० | ० | |
| | | | | छोटे पाटबंधारे विभाग | | | | | |
| १. | कनिष्ठ आरेखक | तांत्रिक | ४ | २ | २ | १ | १ | १ | |
| २. | अनुरेखक | तांत्रिक | २० | ९ | ११ | १ | १ | ० | |
| | एकूण . . | | २४ | ११ | १३ | २ | २ | ० | |

## आरोग्य विभाग

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | आरोग्य सेवक (पुरुष) | तांत्रिक | २९० | २७९ | ११ | २० | २० | ० | |
| २. | आरोग्य पर्यवेक्षक | तांत्रिक | ५ | ५ | ० | ० | ० | ० | |
| ३. | प्रयोगशाळा तंत्रज्ञ | तांत्रिक | ८ | ६ | २ | १ | ० | १ | अनुशेषाची पदे ५२ % च्या मर्यादित भरणेत आलेली आहेत. |
| ४. | आरोग्य सेवा (महिला) | तांत्रिक | ६५९ | ६१७ | ४२ | ४६ | ४१ | ५ | २ पदे जाहिरातीमध्ये, २ पदे भुकंपग्रस्त, ९ पद मनपा वर्ग |
| ५. | मिश्रक | तांत्रिक | १२१ | ११३ | ८ | ९ | १ | ८ | ५ पदे जाहिरात, १ पद ग्राप कर्मचारी, २ पदे प्रकल्पग्रस्त |
| ६. | कृष्ठरोग तंत्रज्ञ | तांत्रिक | ५० | १९ | ३१ | ४ | ० | ४ | सदरची पदे अतिरिक्त ठरविणेत आली आहेत. |
| ७. | अवैद्यकिय पर्यवेक्षक | तांत्रिक | २ | ० | २ | ० | ० | ० | |
| ८. | वैद्यकिय वर्ग-३ | तांत्रिक | ३० | ३० | ० | २ | २ | ० | |
| | एकूण . . | | ११६५ | १०६९ | ९६ | ८२ | ६४ | १८ | |

| अ.क्र. | संवर्गाचे नांव | तांत्रिक/ अतांत्रिक | एकूण मंजूर पदे | प्रत्यक्षात भरण्यात आलेली पदे | रिक्त पदे | अनुसूचित जमातीच्या उमेदवारांसाठी राखीव एकूण पदे | प्रत्यक्षांत असलेल्या अनु. जमातीच्या कर्मचाऱ्यांची संख्या | अनुशेष | अ.ज. अनुशेष राहण्याची कारणे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) |
| **शिक्षण (प्राथमिक विभाग)** | | | | | | | | | |
| १. | प्राथमिक शिक्षक | तांत्रिक | ११६८६ | ११५४१ | १४५ | ८१८ | ७८९ | २९ | दि. ८/२/०८ च्या जाहिरातीमध्ये ८१ पदांची जाहिरात दिली आता ५२ रूजू झाले त्यानंतर आज एकूण १४ उमेदवारांना दि. ३०/५/२००९ रोजी शिक्षणसेवक पदी नियुक्ती आदेश देण्यात आलेले आहेत. उर्वरित पदे नविन भरती प्रकियेमध्ये भरणेत येईल |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २. | वि.अ. शिक्षण श्रेणी २ | तांत्रिक | ४३ | ४० | ३ | ३ | ३ | ० | |
| ३. | एकूण | | ११७२९ | ११५८१ | १४८ | . . | ७९२ | २९ | |
| | एकूण वर्ग क | | १४८६३ | १४५१८ | ३४५ | . . | . . | ५८ | |
| | वर्ग ४ड | | | . . | | . . | | | |
| | परिचर ड | अतांत्रिक | ९५२ | ९२१ | ३१ | | | १ | ३०/४/०९ रोजी १ पद सेवा निवृत्त झाल्याने ग्रामपंचायत कर्मचा-यांमधून भरणेची कार्यवाही चालू आहे. |
| | एकूण . . | वर्ग ३+वर्ग ४ | १५८१५ | १५४३९ | ३७६ | ११०२ | १०४३ | ५९ | |

## सामान्य प्रशासन विभाग (पदोन्नतीद्वारे)

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | कक्ष अधिकारी | अतांत्रिक | २१ | २१ | ० | १ | १ | ० | |
| २. | अधीक्षक | अतांत्रिक | ४२ | ४२ | ० | ३ | ३ | ० | |
| ३. | वरिष्ठ सहायक | अतांत्रिक | ९३ | ९३ | ० | ७ | ७ | ० | |
| ४. | लघुलेखक (उ.श्रे) | अतांत्रिक | १ | १ | ० | १ | १ | ० | |
| ५. | कनिष्ठ सहायक | अतांत्रिक | ८१ | ७४ | ७ | ६ | ४ | २ | शैक्षणिक अर्हता प्राप्त उमेदवार उपलब्ध नाहीत. |

| अ.क्र. | संवर्गाचे नांव | तांत्रिक/ अतांत्रिक | एकूण मंजूर पदे | प्रत्यक्षात भरण्यात आलेली पदे | रिक्त पदे | अनुसूचित जमातीच्या उमेदवारांसाठी राखीव एकूण पदे | प्रत्यक्षांत असलेल्या अनु. जमातीच्या कर्मचा-यांची संख्या | अनुशेष | अ.ज. अनुशेष राहण्याची कारणे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) |
| ६. | वाहनचालक | तांत्रिक | १३३ | ४६ | ८७ | ९ | ३ | ६ | पदोन्नतीकरिता अजप्रवर्गातील विहित परिक्षा उत्तीर्ण झालेले उमेदवार उपलब्ध नाहीत. |
| | एकूण . . | | ३७१ | २७७ | ९४ | | | ८ | |
| | **अर्थ विभाग** | | | | | | | | |
| | सहाय्यक लेखाधिकारी | अतांत्रिक | २५ | २३ | २ | २ | २ | ० | |
| १. | कनिष्ठ लेखाधिकारी | अतांत्रिक | २७ | २७ | ० | २ | १ | १ | पदोन्तीकरिता अज प्रवर्गातील विहित परिक्षा उत्तीर्ण झालेले उमेदवार उपलब्ध नाहीत. |
| २. | वरिष्ठ सहायक लेखा | अतांत्रिक | ६८ | ५८ | १० | ५ | २ | ३ | पदोन्नतीकरिता अज प्रवर्गातील उमेदवार कक्ष लेखा च्या सेवा ज्येष्ठता यादीमध्ये उपलब्ध नाहीत. |
| | एकूण . . | | १२० | १०८ | १२ | ९ | ५ | ४ | |

## ग्रामपंचायत विभाग

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | ग्रामविकास अधिकारी | तांत्रिक | १३० | १०५ | २५ | ९ | ७ | २ | जात वैधता प्रमाणापत्रा अभावी रिक्त |
| २. | विस्तार अधिकारी (पं). | तांत्रिक | ४१ | ३९ | २ | ३ | ३ | ० | |
| | एकूण . . | | १७१ | १४४ | २७ | १२ | १० | २ | |

## बालकल्याण विभाग

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | स.बा.वि.प्र. अधिकारी | तांत्रिक | १२ | १२ | ० | १ | १ | ० | |
| | एकूण . . | | १२ | १२ | ० | १ | १ | ० | |

## पशुसंवर्धन विभाग

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | सहा. पशुधन विकास अधिकारी | तांत्रिक | १७ | १३ | ४ | १ | १ | ० | |
| | एकूण . | | १७ | १३ | ४ | १ | १ | ० | |

## कृषि विभाग

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | कृषि अधिकारी | तांत्रिक | १४ | १४ | ० | १ | १ | १ | |
| २. | विस्तार अधिकारी (कृषि) | तांत्रिक | १८ | १७ | १ | १ | १ | ० | |
| | एकूण . | | ३२ | ३१ | १ | २ | २ | ० | |

| अ.क्र. | संवर्गाचे नांव | तांत्रिक/ अतांत्रिक | एकूण मंजूर पदे | प्रत्यक्षात भरण्यात आलेली पदे | रिक्त पदे | अनुसूचित जमातीच्या उमेदवारांसाठी राखीव एकूण पदे | प्रत्यक्षांत असलेल्या अनु. जमातीच्या कर्मचा-यांची संख्या | अनुशेष | अ.ज. अनुशेष राहण्याची कारणे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) |
| | | | | **बांधकाम उत्तर विभाग** | | | | | |
| १. | कनिष्ठ अभियंता | तांत्रिक | ७५ | ४५ | ३० | ५ | ० | ५ | |
| | | | | **छोटे पाटबंधारे विभाग** | | | | | |
| १. | मुख्य आरेखक | तांत्रिक | १ | ० | १ | ० | ० | ० | |
| २. | आरेखक | तांत्रिक | ३ | ३ | ० | ० | ० | ० | |
| ३. | कनिष्ठ आरेखक | तांत्रिक | १२ | ६ | ६ | १ | १ | ० | |
| | एकूण | | १६ | ९ | ७ | १ | १ | ० | |
| | | | | **आरोग्य विभाग** | | | | | |
| १. | आरोग्य पर्यवेक्षक | तांत्रिक | १४ | १४ | ० | १ | १ | ० | |
| २. | अवैद्यकिय पर्यवेक्षक | तांत्रिक | ६ | १ | ५ | १ | ० | १ | सदरची पदे अतिरिक्त ठरविणेत आली आहेत. |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ३. | आरोग्य सहा.(महिला) | तांत्रिक | १०६ | १०६ | ० | ७ | १ | ६ | आकृतीबंधानुसार पदे कमी झाल्याने भरती केलेली नाही. |
| ४. | आरोग्य सहा (पुरुष) | तांत्रिक | १५९ | १५९ | ० | ११ | ११ | ० | |
| | एकूण | | २८५ | २८० | ५ | २० | १३ | ७ | |
| | **शिक्षण (प्राथमिक विभग)** | | | | | | | | |
| १. | वि.अ. शिक्षण श्रेणी २ | तांत्रिक | १४ | ७ | ७ | १ | १ | ० | |
| | वि.अ. शक्षिंण श्रेणी ३ | | ४० | १५ | २५ | ३ | ० | ३ | जात वैधता प्रमाणपत्रा-अभावी रिक्त |
| | मुख्याध्यापक | | ८९८ | ७०१ | १९७ | ६३ | ५५ | ८ | जात वैधता प्रमाणपत्रा-अभावी रिक्त |
| २. | केंद्र प्रमुख | | ३०५ | २३६ | ६९ | २१ | १७ | ४ | जात वैधता प्रमाणपत्रा-अभावी रिक्त |
| | एकूण | | १२५७ | ९५९ | २९८ | ८८ | ७३ | १५ | जात वैधता प्रमाणपत्रा-अभावी रिक्त |
| | एकूण वर्ग क | | २३५६ | १८७८ | ४७८ | | | | |
| | वर्ग ४ | | | | | ० | | | |
| | व्रणोपचारक | तांत्रिक | ४४ | ३३ | ११ | ३ | ३ | ० | |
| | एकूण वर्ग ३+वर्ग ४ | २४०० | १९११ | ४८९ | १६९ | १२८ | ४१ | ० | |

उक्त माहितीच्या अनुषंगाने समितीने अशी विचारणा केली की, पुणे जिल्हा परिषदेतील विविध विभागामध्ये तांत्रिक/अतांत्रिक स्वरुपाच्या वर्ग १ ते ४ मधील एकूण किती पदे मंजूर आहेत. त्यापैकी, किती पदे प्रत्यक्षात भरण्यात आलेली आहेत व अद्याप किती पदे रिक्त आहेत. पदे रिक्त राहण्याची कारणे काय आहेत व सदर रिक्त पदे भरण्यासाठी आतापर्यंत काय प्रयत्न करण्यात आलेले आहेत अशी विचारणा केली असता, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी जिल्हा परिषद कार्यालयीत सरळ सेवेचे प्रमाण जास्त आहे. सामान्य प्रशासन विभागात एकूण ५४९ पदे मंजूर असून प्रत्यक्षात ५४८ पदे भरण्यात आलेली आहेत. त्यामध्ये एक पद रिक्त असून, अनुसूचित जमातीच्या कर्मचा-यांची संख्या ३८ आहे. यापैकी, ग्रामपंचायत विभागामध्ये तांत्रिक आणि अतांत्रिक स्वरुपाची एकूण ८७८ मंजूर पदे असून, अनुसूचित जमातीच्या उमेदवारांसाठी ६२ पदे राखीव आहेत. अनुसूचित जमातीचे प्रत्यक्षात कार्यरत असलेल्या उमेदवारांची संख्या ५८ आहे, ४ पदांचा अनुशेष शिल्लक आहे. ग्रामपंचायत विभागामध्ये ग्रामसेवकाची (अतांत्रिक) एकूण ८०६ पदे मंजूर आहेत. प्रत्यक्षात ७७८ पदे भरण्यात आलेली आहेत. विविध प्रवर्गातील भरावयाची एकूण २८ पदे रिक्त आहेत. अनुसूचित जमातीच्या उमेदवारांसाठी ५७ पदे आहेत. त्यामध्ये ५५ पदे भरलेली असून दोनचा अनुशेष शिल्लक दाखविण्यात आलेला आहे. यामध्ये १ पद ग्रामपंचायत कर्मचा-यासाठी राखीव असून पात्र उमेदवार उपलब्ध नाही. १ पद आंतरजिल्हा बदली प्रस्ताव मान्य केला असून, जिल्हा परिषदेकडून कार्यरत कर्मचारी कार्यमुक्त केल्यानंतर भरण्यात येईल. पशुधन पर्यवेक्षकाची ११ पदे आहेत. यामध्ये ७ कर्मचारी कार्यरत आहेत. ४ पदांचा अनुशेष असून, सदर पदे भरण्यास स्थगिती देण्यात आलेली आहे.

तसेच अनुसूचित जमातीसाठी आरोग्य सेवकाची (महिला) ४६ पदे आहेत. यामध्ये ४१ कर्मचारी कार्यरत आहेत. ५ पदांचा अनुशेष असून, २ पदांची जाहिरात देण्यात आलेली आहे. यामध्ये २ पदे भूकंपग्रस्त आणि १ पद महानगरपालिकेकडे वर्ग करण्यात आले आहे. अनुसूचित जमातीसाठी मिश्रकाची ९ पदे आहेत. यामध्ये १ कर्मचारी कार्यरत आहे. ८ पदांचा अनुशेष शिल्लक असून, ५ पदे भरण्यासाठी जाहिरात देण्यात आलेली आहे. यामध्ये १ पद ग्रामपंचायतीसाठी असून, २ पदे प्रकल्पग्रस्तांसाठी राखून ठेवण्यात आलेली आहे. तसेच प्राथमिक शिक्षकाची अनुसूचित जमातीसाठी ८१८ पदे आहेत. यामध्ये ७७१ अनुसूचित जमातीचे उमेदवार कार्यरत आहेत. ४७ पदांचा अनुशेष शिल्लक दाखविण्यात आलेला आहे. दिनांक ८ फेब्रुवारी २००८ रोजीच्या जाहिरातीमध्ये ८१ पदांची जाहिरात दिलेली होती. एकूण ११७ उमेदवारांना शिक्षण सेवक पदी नियुक्ती आदेश देण्यात आलेले आहेत. त्यातील एकूण ३४ उमेदवार हजर झालेले आहेत. उर्वरित पदे नवीन भरती प्रक्रियेमध्ये भरण्यात येईल. असे समितीला सांगितले. समितीने कार्यरत असणा-या उमेदवारांची जात प्रमाणपत्रांची पडताळणी ३ महिन्याच्या आत करून घेण्यात यावी. तसेच अनुसूचित जमातीसाठी रिक्त असणारी १९९५ च्या अगोदर आणि १९९५ च्या नंतरची किती पदे आहेत. या प्रश्नाच्या संदर्भात दिनांक ३ जुलै २००९ रोजी होणा-या आढावा बैठकीत समितीला

माहिती देण्यात यावी. आदिवासी उमेदवारांवर अन्याय होता कामा नये, यासाठी जिल्हा परिषदेने योग्य ती काळजी घेतली पाहिजे. ज्या उमेदवारांना जात पडताळणीची नोटीस देऊन सुद्धा त्यांनी ६ महिन्याच्या आत जात पडताळणी करून घेतलेली नसेल तर अशा उमेदवारांना पदावनत करण्यात यावे तसेच उपस्थित खाते प्रमुखांनी त्यांच्याकडे विभागनिहाय कार्यरत असलेल्या अनुसूचित जमातीच्या कर्मचा-यांच्या नेमणूकीपासून सहा महिन्यामध्ये ज्यांची जात पडताळणी झालेली नाही, त्यांना आपण पत्रव्यवहार केला आहे काय, त्यांच्यावर नियमाप्रमाणे कार्यवाही करून समितीला अहवाल सादर करावा असे समितीने निदेश दिले.

तसेच शिक्षकांची पदे रिक्त का राहिली आहेत अशी समितीने विचारणा केली त्यावर मुख्यकार्यकारी अधिकारी जि.प. यांनी मागील वर्षी ८१ पदांची जाहिरात दिली होती. आता शासनाच्या नवीन धोरणानुसार हीच प्रतिक्षा यादी असून ११७ उमेदवारांना नेमणूकीचे पत्र दिलेले आहे. त्यापैकी दिनांक ३१ मे २००९ पर्यंत ३४ उमेदवार हजर झालेले आहेत. शासनाच्या धोरणानुसार सी.ई.टी.द्वारे निवड केलेली आहे. तसेच कनिष्ठ सहायकाची दोन पदे रिक्त आहेत. परिचरमधून कनिष्ठ सहायकाची पदोन्नती दिली जाते. या संवर्गामध्ये शैक्षणिक अर्हताप्राप्त उमेदवार उपलब्ध नाहीत. त्यामुळे दोन पदे राहिलेली आहेत. या पदावर वैद्यता प्रमाणपत्र घेऊन नेमणूक आदेश देण्यात येतील असे सांगितले.

तसेच पदोन्नतीमध्ये कनिष्ठ लेखाधिकारी हे एक पद रिक्त आहे. पदोन्नतीकरिता अनुसूचित जमाती प्रवर्गातील विहीत परीक्षा उत्तीर्ण झालेले उमेदवार उपलब्ध नाहीत. वरीष्ठ सहायक लेखा यामध्ये तीन पदांचा अनुशेष आहे. या पदासाठीदेखील पदोन्नतीकरिता अनुसूचित जमाती प्रवर्गातील विहीत परीक्षा उत्तीर्ण झालेले उमेदवार उपलब्ध नाहीत असे मुख्यलेखा व वित्त अधिकारी, ज़ि.प. यांनी समितीला सांगितले.

ग्रामविकास अधिका-यांची दोन पदे रिक्त आहेत. त्यांच्या नियुक्त्या झाल्या असून त्यांच्याकडे जात प्रमाणपत्र नसल्यामुळे अद्याप नेमणूक दिलेली नाही. ग्रामपंचायत विभागात ग्रामविकास अधिकारी व विस्तार अधिकारी या पदावर अनुसूचित जमातीचे १० कर्मचारी कार्यरत आहेत व २ पदे रिक्त आहेत. असे उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीला सांगितले. समितीने ज्या विभागातील कर्मचा-यांकडे जात वैधता प्रमाणपत्र नाहीत. ज्यांची नेमणूक होऊन सहा महिन्यापेक्षा जास्त कालावधी झालेला आहे. त्यांची नावे, नेमणूक दिनांक, किती वर्षापासून जात वैधता प्रमाणपत्र दिलेले नाही, त्यावर जिल्हा परिषदेने केलेली कारवाई याची माहिती आढावा बैठकीत समितीला सादर करण्यात यावी असे निदेश दिले.

दिनांक ३ जुलै २००९ रोजीच्या आढावा बैठकीत पुढील प्रमाणे माहिती देण्यात आली. समितीने अनुसूचित जमातीचे जात वैधता प्रमाणपत्र मिळाली नाहीत असे किती कर्मचारी जिल्हा परिषदेच्या सेवेत आहेत अशी विचारणा केली त्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी जिल्हा परिषदेतील सर्व विभागातील कर्मचा-यांचा विचार केला तर अनुसूचित जमातीचे १२५३ कर्मचारी आहेत, १९९५

नंतरचे ६४० कर्मचारी असून, १९९५ पूर्वीचे ४९२ आहेत. १९९५ नंतरच्या ६४० कर्मचा-यांपैकी ४१० कर्मचा-यांची जात वैधता झालेली आहे. २३० कर्मचा-यांची जात वैधता झालेली नाही. तालुका व जिल्हा पातळीवर हा मोठा आकडा आहे. त्यामुळे त्यांच्यावर कारवाई करण्यासाठी आम्हाला सहा महिन्याची मुदत मिळावी, त्यामुळे या कर्मचा-यांना पुन्हा नोटीस देण्यात येईल. त्यांनी सहा महिन्यात जात वैधता प्रमाणपत्र दिले नाही तर त्यांच्यावर पुढील कारवाई करण्यात येईल. असे समितीला सांगितले.

समितीने या संदर्भात सुप्रीम कोर्टाचा निर्णय असा आहे की, १९९५ नंतर नेमणूक केलेल्या कर्मचा-याकडे जात वैधता प्रमाणपत्र नसेल तर त्यांना बडतर्फ करावे. १९९५ पूर्वीच्या कर्मचा-यांना सवलत दिली आहे. पदोन्नती दिली असेल तर पदावनत करावयाचे आहे. काही ठिकाणी अशा कर्मचा-यांना निलंबित केले आहे, परंतु पुन्हा रि-इन्सीस्ट केले आहे. समितीने ज्या कर्मचा-यांना कायम निलंबित करण्याचे सांगितले असेल व त्यांना पुन्हा रि-इन्सीस्ट केले जात असेल, तर ख-या आदिवासींना समिती न्याय देऊ शकणार नाही, असे समितीचे मत आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी कारवाईसाठी ६ महिन्यांचा वेळ मागितला आहे. परंतु एवढी मुदत देता येणार नाही, कारण आचारसंहिता सुरू होणार आहे. तत्पूर्वी आपणास काही करता येईल काय अशी विचारणा केली असता, मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. यांनी २३० कर्मचा-यांना लवकरच प्रत्यक्ष बोलावून घेतो. समितीचे म्हणणे त्यांना समजावून सांगतो. त्यांच्याकडून लवकरात लवकर जात वैधता प्रमाणपत्र घेतले जातील असे सांगितले. समितीने विभागीय सचिवांची साक्ष होण्यापूर्वी या कर्मचा-यांवर निलंबन किंवा पदावनतची कारवाई करण्यात यावी. या कर्मचा-यांना शेवटची संधी देण्यात यावी व दिनांक ३० जुलै २००९ पर्यंत कारवाई करून केलेल्या कारवाईचा अहवाल समितीला सादर करावा. तसेच कर्मचा-याचे नाव, सेवेत रुजू झाल्याची तारीख, किती वर्षापासून वैधता प्रमाणपत्र दिलेले नाही, जि.प. ने किती वेळा नोटीस दिली आहे अशा आशयाचा तक्ता तयार करून समितीला माहिती सादर करावी. सन १९९९ ते २००९ असे १० वर्ष काही कर्मचा-यांना जात वैधता प्रमाणपत्र मिळत नसेल तर अशा लोकांना तुम्ही पाठीशी घालत आहात. खरे तर समिती येण्यापूर्वी तुम्ही त्यांच्यावर कारवाई करावयास पाहिजे होती. जिल्हा परिषदेने अशा कर्मचा-यांवर निलंबनाची कारवाई करून त्याची माहिती साक्षीच्या वेळी देण्यात यावी. असे समितीने निदेश दिले.

समितीने प्राथमिक व माध्यमिक शिक्षकांची संस्थेमध्ये पदे भरताना मागासवर्गीयांची पदे भरली जातात, एकूण अनुशेष असलेल्या ७० पदांपैकी अद्यापही ३३ पदाचा अनुशेष आहे. संस्था चालक सांगतात की, पात्र उमेदवार मिळत नाही. एका संस्थेत ३१ शिक्षकांची पदे रिक्त आहेत तर दुस-या संस्थेत ११ शिक्षकांची पदे रिक्त आहेत. अशी समितीने विचारणा केली असता शिक्षणाधिकारी यांनी अनुशेष भरल्याशिवाय

शिक्षणसंस्थांना मान्यता देत नाही, असे समितीला सांगितले. मोठ्या मोठ्या संस्थामधील दाखविण्यात आलेला अनुशेष हा एकूण ७० पदाचा असून तो पुढील प्रमाणे आहे :—

**७० पदांचा अनुशेष असलेल्या संस्थेची यादी सोबत सादर केली आहे.**

| संस्थेचे नाव<br>(१) | | अनुशेष<br>(२) |
|---|---|---|
| पुणे जिल्हा शिक्षण मंडळ | .. | ४३ |
| शिरुर शिक्षण प्रसारक मंडळ | .. | ११ |
| प्रगती हायस्कुल, मुकई | .. | १ |
| एच.बी.गिरमे विद्यालय, वानवडी | .. | १ |
| वसतीगृह विद्यालय, हाटी | .. | १ |
| ज्ञाने वर विद्यालय, आळंदी खेड | .. | १ |
| नवीन विद्यालय, मरकळ, खेड | .. | १ |
| म.गांधी विद्यालय, उरळीकांचन | .. | १ |
| एम.एस.हायस्कूल, चिंचवड | .. | १ |
| डेक्कन एज्यु. सोसायटी, पुणे | .. | ७ |
| वि वकर्मा विद्यालय, पुणे | .. | १ |
| जवाहरलाल माध्य. विद्यालय<br>केडगाव , नांदेड | .. | १ |
| एकूण | .. | ७० |

समितीने पात्र शिक्षक भरतीसाठी इच्छुक उमेदवारांवर यामुळे अन्याय होत आहे. या संस्थांना अनुसूचित जमातीचे शिक्षक मिळत नाहीत का अनुसूचित जमातीच्या उमेदवारबाबत प्रकल्प अधिकारी, आदिवासी विभागाकडे पत्रव्यवहार केला आहे काय, अशी विचारणा केली त्यावर शिक्षणाधिकारी यांनी या प्राथमिक, माध्यमिक शाळा खाजगी संस्थेच्या आहेत. त्यांच्या स्तरावर नेमणुका केल्या जातात. तत्पूर्वी फक्त शिक्षण विभागाकडून परवानगी घेतली जाते. परवानगी देताना आम्ही त्यांना सांगत असतो की, अनुशेषाप्रमाणे नियुक्त्या कराव्यात. त्याप्रमाणे संस्था जाहिरात देऊन नेमणूका करीत असतात परंतु अशा

शिक्षक नियुक्तीस जिल्हा परिषदेकडून मान्यता दिली जात नाही, असे समितीला सांगितले. समितीने संस्थाचालक त्या त्या वर्गातील उमेदवार मिळाले नाही असे दाखवून दुसरे उमेदवार भरतात. अशावेळी त्या संस्थांचे अनुदान रोखण्यासारखी कारवाई त्या संस्थांच्या विरुद्ध केली पाहिजे, तसेच प्रत्येक शिक्षण संस्थेमध्ये आदिवासीच्या राखीव जागांवर एम.ए.बी.एड. शिक्षक मिळत नाहीत म्हणून त्या जागा रिक्त ठेवतात. परंतु अशा जागांवर बी.ए.बी.एड. शिक्षक भरायला हरकत नाही. पण या संस्था अशा वेळी अशी युक्ती करतात की, योग्य पात्रतेचा आदिवासी उमेदवार मिळत नाहीत म्हणून ११ महिन्यांसाठी त्या जागा आपल्या लोकांतून भरतात आणि तीन वर्षानंतर त्या जागा रद्द करून टाकतात असे समितीच्या निदर्शनास आले आहे. यावर शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनी समितीच्या सूचनेनुसार या संस्थांना नोटिसा देऊ, प्रसंगी त्यांचे अनुदान थांबविण्याचा निर्णय घेतल्याचेही त्यांना कळविले जाईल. तसेच त्यांना सांगितले जाईल की, योग्य पात्रतेचे आदिवासी उमेदवार मिळत नसतील तर आदिवासीबहुल जिल्ह्या-तालुक्यांमध्ये आपण यासाठी जाहिरात द्यावी. तसेच वैधता प्रमाणपत्र सादर केल्याशिवाय आदिवासींच्या राखीव पदांवर भरती करण्यास मान्यता देण्यात येणार नाही, असे समितीला सांगितले.

**जिल्हा परिषद, पुणे येथे झालेल्या बैठकीच्यावेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या अनुषंगाने समितीने दिनांक ३ जून २०१० रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात आली.** साक्षीच्या वेळी समितीने अनुसूचित जमातीच्या २३० कर्मचा-यांची जात वैधता प्रमाणपत्रे संबंधितांना प्रत्यक्ष बोलावून त्यांचेकडून प्राप्त करून घेण्याची कार्यवाही करण्यात येईल असे आ वासित केले होते. ही जात वैधता प्रमाणपत्रे प्राप्त करून घेतली का अशी विचारणा केली त्यावर मुख्यकार्यकारी अधिकारी, जि.प. यांनी या संवर्गनिहाय १९९५ नंतर सेवेत आलेल्या कर्मचा-यांची संख्या ६२७ होती, त्यापैकी ३९९ कर्मचा-यांनी वैधता प्रमाणपत्र सादर केले होते. समितीच्या भेटीच्या वेळी २२८ कर्मचा-यांचे वैधता प्रमाणपत्र प्राप्त झालेले नव्हते. समितीच्या बैठकीनंतर संबंधितांना नोटीस देण्यात आल्यानंतर १५३ कर्मचा-यांनी वैधता प्रमाणपत्र सादर केले. ४७ कर्मचा-यांनी नोटीस दिल्यानंतर न्यायालयातून स्थगिती आदेश मिळविला आहे. २१ कर्मचारी इतर प्रवर्गातून सेवेत आलेले आहेत असे सांगितले. समितीने जिल्हा बैठकीच्यावेळी चर्चा झाल्यानंतरही कर्मचा-यांकडून हायकोर्ट आणि सुप्रीम कोर्टामार्फत स्थगिती आदेश कसे मिळविले जातात. हायकोर्टाने स्थगिती आदेशामध्ये काय म्हटले आहे अशी विचारणा केली. त्यावर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी न्यायालयाचे म्हणणे आहे की, जात वैधता प्रमाणपत्र पडताळणी समिती वेळेवर प्रमाणपत्र देत नाही त्यामुळे त्यांनी वेळापत्रक आखून दिले आहे.

समितीला सादर केलेल्या माहितीमध्ये " दिलेल्या नोटिसीस मा.न्यायालयाने स्थगिती देऊन दिनांक ३१ऑक्टोबर २००९ पर्यंत जात वैधता प्रमाणापत्रे पडताळणी कामी सादर करण्याची मुदत दिली " असे

म्हटले आहे. ही मुदत संपून गेली आहे त्याप्रमाणे दिलेल्या मुदतीत जात प्रमाणपत्रे सादर केले आहे काय अशी समितीने विचारणा केली असता मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. यांनी The High. Court has said in its judgement, "The Petitioners are granted time upto 31st October 2009 to submit their Caste Certificates to Respondent No.2 (रिस्पॉन्डन्ट नं.२ म्हणजे जिल्हा परिषद) The Respondent No.2 shall refer the said Certificate to the concerned caste Scrutiny Committee for verification and request them to expendite the process of Verification. त्यानुसार जात वैधता प्रमाणपत्र दाखले सर्वांनी सादर केलेले आहेत.

ज्या कर्मचा-यांकडे जात वैधता प्रमाणापत्र नाही त्यांचे प्रस्ताव जिल्हा परिषदेने जात वैधता समितीकडे का पाठविले नाहीत. शासनाच्या जी.आर.नुसार आरक्षणाच्या निकषावर कोणताही कर्मचारी सेवेत रुजू झाल्यानंतर त्याने ६ महिन्याच्या आत जात वैधता प्रमाणपत्र सादर करावयास पाहिजे. आता ही ६ महिन्याची मुदत देखील काढलेली आहे. ज्या कर्मचा-यांनी जात वैधता प्रमाणपत्र अद्यापपर्यन्त सादर केली नाहीत ते कर्मचारी अजून पर्यन्त सेवेते कसे काय राहिले या कर्मचा-यांना चुकीच्या पद्धतीने संरक्षण दिले जात आहे असे समितीचे मत आहे. ज्यांच्याकडे जात वैधता प्रमाणपत्र नाही अशा कर्मचा-यांनी १४ क्रमांकाच्या फॉर्मनुसार आवश्यक ती कागदपत्रे आणि पुरावे सादर करावयास पाहिजेत. जिल्हा परिषदेकडून जात पडताळणी समितीकडे प्रस्ताव सादर करताना ते चेकलिस्ट नुसार आणि परिपूर्ण प्रस्ताव सादर केले नसतील तर जात पडताळणी समिती पुन्हा जिल्हा परिषदेस अमुक पुरावा सादर केला तरच जात वैधता प्रमाणपत्र मिळेल असे सांगेल. परिपूर्ण प्रस्ताव नसेल तर कारवाई करण्यास विलंब होतो आणि बोगस कर्मचा-याला संरक्षण मिळत रहाते. तेव्हा उच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार जिल्हा परिषदेने चेकलिस्ट प्रमाणे परिपूर्ण प्रस्ताव तयार करून दिनांक ३१ ऑक्टोबर २००९ पर्यन्त जात पडताळणी समितीकडे सादर करावेत असा उच्च न्यायालयाने निर्णय दिलेला आहे. त्याप्रमाणे ३६ लोकांचे प्रस्ताव जिल्हा परिषदेने जात पडताळणी समितीकडे केव्हा पाठविले अशी पुन्हा समितीने विचारणा केली त्यावर अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. यांनी कर्मचा-यांचे प्रस्ताव केव्हा आले आणि ते जात पडतातळणी समितीकडे केव्हा पाठविले याची संपूर्ण माहिती समितीला सादर करतो. असे समितीला आ वासित केली.

समितीने महाराष्ट्र विधानसभेच्या नियमानुसार ही समिती गठीत झालेली असून सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयानुसार तसेच शासनाच्या निर्णयानुसार संबंधितांवर कारवाई करण्याचे निदेश समितीने दिलेले आहेत असे वकिलांनी न्यायालयाला सांगितले असते तर जिल्हा परिषदेच्या कारवाईस उच्च न्यायालयाने स्थगिती दिली नसती. उच्च न्यायालयाने निर्णय केव्हा दिला अशी विचारणा केली असता सचिव, ग्रामविकास विभाग यांनी न्यायालयाने ४ नोव्हेंबरला निर्णय दिलेला आहे. तसेच उच्च न्यायालयाने दिनांक २ सप्टेंबर २००९ रोजी जात वैधताकामी प्रमाणपत्रे ३१ ऑक्टोबर २००९ पर्यन्त सादर करण्याचे निदेश दिले आहे, असे समितीला सांगितले.

समितीने अशा प्रकरणी आदिवासी विकास विभागाच्या सचिवांना न्यायालयाने कॅव्हेट दाखल करण्यास सांगितले होते. काही लोक कामगार न्यायालयात गेले होते. त्या प्रकरणी कामगार न्यायालयानेही स्थगिती दिलेली आहे. सर्वोच्च न्यायालयाने दिलेला निर्णय, शासनाने घेतलेला निर्णय ह्या बाबी उच्च न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिल्या असत्या तर शो कॉज नोटीसीच्या संदर्भात उच्च न्यायालयाने स्थगिती दिली नसती.

**अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. यांनी न्यायालयाने केव्हा निर्णय दिला, न्यायालयाने दिलेली अंतिम मुदत, त्या मुदतीत प्रस्ताव सादर केले गेले की नाहीत यासंबंधीची माहिती समितीला १५ दिवसात सादर करतो** तसेच सन्माननीय सदस्यांनी सांगितलेले मुद्दे आम्ही आमच्या प्रतिज्ञापत्रात मांडून शासनाची बाजू न्यायालयात मांडू. तसेच जिल्हा परिषदेतील अनेक कर्मचारी औद्योगिक न्यायालयात जातात. सचिव, ग्रामविकास विभाग यांनी सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णया नुसार, शासनाने घेतलेल्या निर्णया नुसार समितीने कारवाई करण्याचे निदेश दिले. असे असताना अशा कारवाईस कामगार न्यायालयाकडून, उच्च न्यायालयाकडून स्थगिती मिळते, काही प्रकरणी आयुक्तांनी देखील स्थगिती दिलेली आहे. असे कर्मचारी औद्योगिक न्यायालयात गेले तर जिल्हा परिषदेने त्याबाबतीत उच्च न्यायालयात अपिल करून सांगायला पाहिजे की अशा प्रकरणी निर्णय घेण्याचे अधिकार औद्योगिक न्यायालयास नाहीत असे समितीने मत व्यक्त केले.

**अभिप्राय व शिफारशी :**

पुणे जिल्हापरिषदेतील वर्ग - ३ व वर्ग - ४ च्या विविध विभागात कार्यरत असलेल्या कर्मचा-यांच्या सरळसेवा व पदोन्नती बाबत आढावा घेत असतांना जिल्हा परिषद कार्यालयात अनुसूचित जमातीची सरळसेवेने वर्ग-३ मध्ये विभागनिहाय एकूण १०३६ पदे राखून ठेवण्यात आली आहे. त्यापैकी प्रत्यक्षात विभागनिहाय ९७८ पदे भरण्यात आलेली आहे. सरळसेवेची ५८ पदे रिक्त आहे. अनुसूचित जमातीसाठी राखून ठेवण्यात आलेली व पदोन्नतीने भरावयाची वर्ग-३ मध्ये विभागनिहाय १६६ कर्मचा-यांपैकी १२५ कर्मचा-यांना पदोन्नती देण्यात आलेली असून ४१ पदे पदोन्नती अभावी रिक्त असल्याचे निदर्शनास आले आहे. समितीने अनुसूचित जमातीच्या २३० कर्मचा-यांची जात वैधता प्रमाणपत्रे प्राप्त करून घेण्याची कार्यवाही करण्यात येईल असे आ वासित केले असताना जिल्हा परिषद कार्यालयात अनुसूचित जमातीच्या कार्यरत असणा-या उमेदवाराची जात प्रमाणपत्राची पडताळणी ३ महिन्याच्या आत करून घेण्यात यावी तसेच ज्या उमेदवारांना जात पडताळणीची नोटीस देऊन ६ महिन्यापेक्षा जास्त कालावधी झालेला आहे.

अशा उमेदवारांना पदावनत करण्यात यावे अशी सुचना केली होती. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी शिक्षण सेवक पदी ११७ उमेदवारांना नेमणूकीचे पत्र दिलेले असून त्यापैकी जिल्हा परिषद कार्यालयात ३४ उमेदवार हजर झालेले आहेत. तसेच जिल्हा परिषद कार्यालयातील सर्व विभागातील सेवेत अनुसूचित जमातीचे वर्ग-३ व वर्ग-४ चे एकूण १२५३ कर्मचारी आहेत. त्यामध्ये १९९५ नंतरचे ६२७ कर्मचारी असून १९९५ पूर्वीचे ६२६ कर्मचारी आहेत. यामध्ये १९९५ नंतरच्या ६२७ कर्मचा-यांपैकी ५५२ कर्मचा-यांची जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त झालेले आहे. ४७ कर्मचा-यांनी न्यायालयातून स्थगिती मिळविली आहे. २१ कर्मचारी इतर प्रवर्गातून सेवेत आलेले आहेत. ४ कर्मचा-यांनी जात वैधता प्रमाणपत्र सादर केलेले नाही. अशा कर्मचा-यांकडून जात पडताळणी प्रमाणपत्र प्राप्त करून घेण्यासाठी सहा महिन्याची मुदत देण्यात यावी व त्यानंतर या कर्मचा-यांनी जात वैधता प्रमाणपत्र सादर केले नाही तर त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल असे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सुचना केली. या संदर्भात सुप्रीम कोर्टाचा निर्णय असा आहे की, १९९५ नंतर नेमणूक केलेल्या कर्मचा-याकडे जात वैधता प्रमाणपत्र नसेल तर त्यांना बडतर्फ करावे. १९९५ पूर्वीच्या कर्मचा-यांना संरक्षण दिले आहे. परंतु अशा कर्मचा-यांना पदोन्नती दिली असेल तर त्यांना पदावनत करावयाचे आहे. काही ठिकाणी कर्मचा-यांना निलंबित केले आहे, परंतु पुन्हा त्यांची पुनर्नियुक्ती केली आहे. समितीने ज्या कर्मचा-यांना कायम निलंबित करण्याचे सांगितले असेल व त्यांना पुन्हा पुनर्नियुक्त केले जात असेल, तर ख-या आदिवासींना समिती न्याय देऊ शकणार नाही. **समितीने ज्या ४७ कर्मचा-यांनी न्यायालयाकडून स्थगिती मिळविली आहे याबाबतीत स्थगितीचा अवधी संपल्यानंतर सुद्धा त्यांनी जात वैधता प्रमाणापत्र सादर केले नाही तर त्यांच्यावर निलंबन किंवा पदावनत करण्याची कारवाई मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्यामार्फत तत्काळ करण्यात यावी व केलेल्या कारवाईचा अहवाल समितीला पाठविण्यात यावा अशी समितीची शिफारस आहे.**

**तसेच जिल्हा परिषद कार्यालयात अनुसूचित जमातीची विभागनिहाय सरळसेवेची ५८ पदे व पदोन्नतीने भरावयाची ४१ पदे रिक्त आहेत. रिक्त असलेली पदे तातडीने भरण्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. यांनी कार्यवाही करावी व केलेल्या कारवाईचा अहवाल समितीला पाठविण्यात यावा अशी समितीची शिफारस आहे.**

प्राथमिक व माध्यमिक शिक्षकांच्या संस्थेमध्ये पदे भरताना मागासवर्गीयांची पदे भरली जात असताना एकूण अनुशेष असलेल्या ७० पदांपैकी अद्यापही ३३ पदाचा अनुशेष आहे. शिक्षणाधिकारी यांनी अनुशेष भरल्याशिवाय शिक्षणसंस्थांना मान्यता देत नाही. या शाळा खाजगी संस्थेच्या आहेत. त्यांच्या स्तरावर नेमणुका केल्या जातात. तत्पूर्वी शिक्षणविभागाची परवानगी देताना त्यांना अनुशेषाप्रमाणे नियुक्त्या कराव्यात असे सांगण्यात येते. त्याप्रमाणे संस्था जाहिरात देऊन नेमणूका करीत असतात परंतु अशा शिक्षण नियुक्तीस जिल्हा परिषदेकडून मान्यता दिली जात नाही. अशावेळी संस्थाचालक त्या त्या वर्गातील

उमेदवार मिळाले नाही असे दाखवून दुसरे उमेदवार भरतात. तेव्हा अशा संस्थेचे अनुदान रोखण्यासारखी कारवाई त्या संस्थांच्या विरुद्ध केली पाहिजे. शिक्षण संस्थेमध्ये आदिवासींच्या राखीव जागांवर एमए.बी.एड शिक्षक मिळत नाहीत म्हणून त्या जागा रिक्त ठेवतात. परंतु अशा जागांवर बीए.बीएड शिक्षक भरायला हरकत नाही. पण या संस्था योग्य पात्रतेचा आदिवासी उमेदवार मिळत नाहीत म्हणून ११ महिन्यांसाठी त्या जागा आपल्या लोकांतून भरतात आणि तीन वर्षानंतर त्या जागा रद्द करुन टाकतात असे समितीच्या निदर्शनात आले आहे. **शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनी अशा संस्थांना अनुसूचित जमातीसाठी राखीव असलेली पदे भरण्याबाबत त्यांना नोटिसा देण्यात येतील, प्रसंगी त्यांचे अनुदान थांबविण्याचा निर्णय घेऊन त्यांना कळविले जाईल. तसेच जर योग्य पात्रतेचे आदिवासी उमेदवार मिळत नसतील तर आदिवासी बहुल जिल्हा तालुक्यांमध्ये आपण यासाठी जाहिरात द्यावी. तसेच वैधता प्रमाणपत्र सादर केल्याशिवाय आदिवासींच्या राखीव पदांवर भरती करण्यास मान्यता देण्यात येणार नाही . असे ही संबंधित संस्थांना कळविण्यात येईल. समितीने शिक्षणाधिकारी यांनी सुचविलेल्या सूचना नुसार तातडीने कारवाई करण्यात यावी व केलेल्या कारवाईचा अहवाल समितीला तात्काळ पाठविण्यात यावा, अशी समितीची शिफारस आहे.**

# परिशिष्ट

## (समितीच्या बैठकीचे संक्षिप्त कार्यवृत्त)

## पहिली बैठक

### मंगळवार, दिनांक २७ जानेवारी २००९

समितीची बैठक जिल्हा परिषद, कार्यालय, अकोला येथे झाली. सदरहू बैठकीस खालील सदस्य व अधिकारी उपस्थित होते.

### उपस्थिती

**समिती प्रमुख :**

१. श्री. महादु बरोरा, वि.स.स. तथा समिती प्रमुख.

**सदस्य :**

२. श्री. तुकाराम बिरकड, वि.स.स.
३. श्री. सुरेश इंगळे, वि.स.स.
४. श्री. बाळा नांदगावकर, वि.स.स.
५. डॉ. संदीप धुर्वे, वि.स.स.
६. श्री. राजकुमार पटेल, वि.स.स.
७. श्री. दिलीपराव सोनवणे, वि.प.स.
८. श्री. परशुराम उपरकर, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

श्री. ए. आर. पिंपळे, अवर सचिव.

**जिल्हा परिषद, अकोला**

१) श्री. नितीनकुमार खाडे, मु.का.अधिकारी, जि.प.,अकोला.
२) श्री. चंद्रकांत गुडेवार, अति.मु.का.अधिकारी.
३) श्री. जी.बी. बेहळे, प्रकल्प संचालय, जि.ग्रा.वि.यंत्रणा, अकोला.
४) श्री. वा.वा.खर्चे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जि.प.
५) श्रीमती उषा डी. उबरहांडे, उप मुख्य का.अधिकारी (सा.), जि.प.
६) डॉ. कमजकिशोर फुटाणे, उप मुख्य का.अधिकारी (पं.), जि.प.
७) श्री. दिवाकर पाटील, का.अ., बांधकाम, जि.प.
८) श्री. एस.आर.सोनवने, का.अ.(प्रभारी), ल.पा.,जि.प.
९) डॉ. गणेश रचकुंडवार, जि.आरोग्य अधिकारी, जि.प.
१०) श्री. प्रकाश जाधव, शिक्षणाधिकारी, प्राथमिक, जि.प.
११) श्री. माधव जुमडे, शिक्षणाधिकारी, माध्यमिक, जि.प.
१२) श्री. एस.जी.जवंजाळ, स.क.अधिकारी (प्रभारी), जि.प.
१३) श्री. जी.पी.गरड, अपर आदिवासी आयुक्त, अमरावती.
१४) श्री. व्ही.बी.गिरी, प्रकल्प अधिकारी, अकोला.
१५) श्री. डी.जी.चांडोळे,नायब तहसीलदार.
(मा.व.कक्ष, आयुक्त कार्यालय, अमरावती)

समितीने या बैठकीत अकोला जिल्हा परिषद कार्यालयातील अनुसूचित जमातीचे अधिकारी/कर्मचारी यांची सरळसेवा भरती, बढती, आरक्षण व अनुशेष याबाबत तसेच आदिवासी जमातीकरिता राबविण्यात येणा-या योजनांबाबत आढावा घेण्यासाठी संबंधित अधिका-यांबरोबर चर्चा करुन माहिती घेतली.

## दुसरी बैठक

### बुधवार, दिनांक २८ जानेवारी २००९

समितीची बैठक जिल्हा परिषद कार्यालय, बुलढाणा येथे झाली. सदरहू बैठकीस खालील सदस्य व अधिकारी उपस्थित होते.

**उपस्थिती**

**समिती प्रमुख :**

१. श्री. महादु नागो बरोरा, वि.स.स. तथा समिती प्रमुख.

**सदस्य :**

२. श्री. तुकाराम बिरकड, वि.स.स.
३. श्री. सुरेश इंगळे, वि.स.स.
४. श्री. बाळा नांदगावकर, वि.स.स.
५. डॉ. संदीप धुर्वे, वि.स.स.
६. श्री. राजकुमार पटेल, वि.स.स.
७. श्री. दिलीपराव सोनवणे, वि.प.स.
८. श्री. परशुराम उपरकर, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

श्री.ए. आर. पिंपळे, अवर सचिव.

**जिल्हा परिषद, बुलढाणा**

१. श्री.एस.जे.कोचे, मुख्य कायर्कारी अधिकारी.
२. श्री.बी.एन.उबाळे, अतिरिक्त मुख्य कायर्कारी अधिकारी.
३. श्री.ए.जी.वाजे, प्रकल्प संचालक, जि.ग्रा.वि.य.
४. श्री.ए.आर.पवार, उप मुख्य कायर्कारी अधिकारी (सामान्य प्रशासन).
५. श्री.माधव नागरगोजे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी.
६. श्री.एस.एन.मेसरे, उप मुख्य कायर्कारी अधिकारी (बालकल्याण).
७. श्री.ए.डी.शिंदे, शिक्षणाधिकारी , प्राथमिक.
८. श्री.अनिल पारधी, शिक्षणाधिकारी, माध्यमिक.
९. श्री.आर.बी.कसबे, जिल्हा आरोग्य अधिकारी.
१०. श्री.एन.जे.जाधव, कार्यकारी अभियंता, सिंचन.
११. श्री.एस.सी.निकम, कायर्कारी अभियंता, बांधकाम व ग्रा.पा.पु.
१२. श्री.एस.एस.नागापुरकर, समाजकल्याण अधिकारी.
१३. श्री.वारघडे, कृषी विकास अधिकारी.
१४. डॉ.एस.एम.चव्हाण, जिल्हा पशुसंवधर्न अधिकारी.

समितीने या बैठकीत बुलढाणा जिल्हा परिषद कार्यालयातील अनुसचीत जमातीचे अधिकारी/कर्मचारी यांच्या सरळसेवा भरती, बढती, आरक्षण व अनुशेष याबाबत तसेच आदिवासी जमातीकरीता राबविण्यात येणा-या योजनांबाबत आढावा घेण्यासाठी संबंधित अधिका-यांबरोबर चर्चा करुन माहिती घेतली.

## तिसरी बैठक

### बुधवार, दिनांक १ जुलै २००९

समितीची बैठक जिल्हा परिषद कार्यालय, पुणे येथे झाली. सदरहू बैठकीस खालील सदस्य व अधिकारी उपस्थित होते.

उपस्थिती

**समिती प्रमुख :**

१. श्री. म.ना. बरोरा, वि.स.स. तथा समिती प्रमुख.

**सदस्य :**

२. श्री. सुरेश इंगळे, वि.स.स.

३. श्री. राजकुमार पटेल, वि.स.स.

४. श्री. दिलीपराव सोनवणे, वि.प.स.

५. श्री. परशुराम उपरकर, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

श्री. म.मु.काज, उप सचिव,

श्री. एल.एन.जाधव, समिती अधिकारी.

**विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे**

१. श्रीमती स्नेहल बर्गे, सहायक आयुक्त, मागासवर्ग कक्ष, विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे.

२. श्री. प्रकाश भालेराव, नायब तहसीलदार, मागासवर्ग कक्ष, विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे.

**आदिवासी विकास विभाग**

श्री.लोमेश सलामे, प्रकल्प अधिकारी, घोडेगांव.

**जिल्हा परिषद, पुणे**

१. डॉ. संजीव कुमार, मुख्य कार्यकारी अधिकारी.

२. श्री. एम.एस.धुले, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.).

३. श्री. संजय मस्कर, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (बां.).

४. श्री. सुखदेव बनकर, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी.

५. श्री. अंकुश बगाटे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी.

६. डॉ. रवि शिवदास, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्र).

७. श्री.पी.डी. कासार, प्रकल्प संचालक.

८. श्री. एस.एस.देवकाते, कृषि विकास अधिकारी.

९. डॉ. एच. एच. चव्हाण, जि.आ.अ.

१०. श्री. अ.बा.गुडसूरकर, का.अ.जि.प.(बां.), उत्तर पुणे.

११. श्रीमती मृदला इनामदार, मु.ले.वि.अ.

१२. श्री. आ.एस.परदेशी, का.अ.बांधकाम, (दक्षिण) विभाग, जिल्हा परिषद पुणे.

१३. श्री. पी.एस. कवटे, समाजकल्याण अधिकारी.

१४. श्री. पी.व्ही. पाटील, प्र.शिक्षणाधिकारी (माध्यमिक).

समितीने या बैठकीत जिल्हा परिषद, पुणे कार्यालयातील अनुसूचित जमातीचे अधिकारी/कर्मचारी यांच्या सरळसेवा भरती, बढती, आरक्षण व अनुशेष याबाबत तसेच आदिवासी जमातीकरिता राबविण्यात येणा-या योजनांबाबत आढावा घेण्यासाठी संबंधित अधिका-यांबरोबर चर्चा करुन माहिती घेतली.

## चौथी बैठक

### गुरुवार, दिनांक ३ जून २०१०

समितीची बैठक विधान भवन मुंबई येथे सकाळी ११.३० वाजता घेण्यात आली. सदरहू बैठकीस खालील सदस्य व अधिकारी उपस्थित होते.

**उपस्थिती**

**समिती प्रमुख :**

१. श्री. सुरेश धस, वि.स.स. तथा समिती प्रमुख.

**सदस्य :**

२. श्रीमती निर्मला गावित, वि.स.स.

३. श्री. जगदीशचंद्र वळवी, वि.स.स.

४. श्री. उमाजी बोरसे, वि.स.स.

५. ॲड. चिंतामण वनगा, वि.स.स.

६. श्री. दौलत दरोडा, वि.स.स.

७. श्री. धनराज महाले, वि.स.स.

८. श्री. रमेश शेंडगे, वि.प.स.

९. श्री. परशुराम उपरकर, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

१. श्री. म. मु. काज, उप सचिव,

२. श्री. ला. ना. जाधव, अवर सचिव (समिती).

**ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय**

१. श्री. सुधीर ठाकरे, प्रधान सचिव.

**जिल्हा परिषद, अकोला, बुलढाणा व पुणे येथील अधिकारी वर्ग**

१. श्रीमती अ विनी जोशी, मुख्य कार्यकारी अधिकारी, अकोला, जि.प.

२. श्री. बी.एन.उबाळे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जि. प. बुलढाणा

३. श्री. ए.एल.राऊत, उप मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.

४. श्री. अंकुश बछाटे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी जि. प. पुणे.

५. श्री. शिवदास, उप मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. पुणे.

समितीने या बैठकीत जिल्हा परिषद, अकोला, बुलढाणा व पुणे या कार्यालयातील अनुसूचित जमातीचे अधिकारी/कर्मचारी यांच्या सरळसेवा भरती, बढती, आरक्षण व अनुशेष इत्यादीबाबत विभागीय सचिवांची साक्ष घेतली.

## पाचवी बैठक

समितीची बैठक सोमवार दिनांक १९ जुलै, २०१० रोजी दुपारी ३-०० वाजता विधान भवन, मुंबई येथे घेण्यात आली. सदरहू बैठकीस खालील सदस्य उपस्थित होते.

### उपस्थिती

**समिती प्रमुख :**

१. श्री. सुरेश धस, वि.स.स. तथा समिती प्रमुख.

**सदस्य :**

२. श्री. जगदीशचंद्र वळवी, वि.स.स.

३. श्री. उमाजी बोरसे, वि.स.स.

४. ॲड. चिंतामण वनगा, वि.स.स.

५. श्री. दौलत दरोडा. वि.स.स.

६. श्री. रमेश शेंडगे, वि.प.स.

७. श्री. परशुराम उपरकर, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

श्री.म.मु.काज, उप सचिव,

श्री. ला. ना. जाधव, अवर सचिव (समिती).

समितीने या बैठकीत प्रारुप अहवालावर विचार केला व तो संमत केला.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई